रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक २३८
www.ramprahar.com

रविवार, १६ मार्च २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


अंतरंग


सौरऊर्जेच्या वापरामुळे दर्जेदार आरोग्य सुविधा -मुख्यमंत्री/२

'रविप्रहर'मध्ये विविध विषयांवरील लेख/४

मुरूडच्या सलोनी नाक्तीची मुंबई कबड्डी संघात निवड/८


## १ एप्रिलपासून सर्व वाहनांना फास्टॅग बंधनकारक!




**मुंबई :** राज्यातील सर्व वाहनांना फास्टॅग बंधनकारक करण्यात आला आहे. या संदर्भातील निर्णयाला राज्य मंत्रिमंडळाने काही दिवसांपूर्वीच मंजुरी दिली होती. आता या निर्णयाची अंमलबजावणी १ एप्रिलपासून करण्यात येणार आहे. त्यामुळे सर्व वाहनांना फास्टॅग अनिवार्य असणार आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी) द्वारे चालवल्या जाणाऱ्या सर्व टोल प्लाझांवर फास्टॅगद्वारे पथकर भरणे बंधनकारक असणार आहे, मात्र जे वाहनधारक या पद्धतीचा स्वीकार करणार नाहीत किंवा या पद्धतीने शुल्क भरण्यास असमर्थ असतील तर त्या वाहनधारकांना १ एप्रिलनंतर दुप्पट टोल भरावा लागणार आहे. दरम्यान, फास्टॅग वापरून टोल भरणे अनिवार्य असल्याची सूचना जारी करण्यात आली असल्याची माहिती एमएसआरडीसी अर्थात महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या एका अधिकाऱ्याने दिली.

# आधारकार्ड आणि आरोग्य विमा शिबिर

### नवीन पनवेलमध्ये उपक्रम; आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेलमध्ये आधारकार्ड शिबिर आणि आदित्य बिर्ला आरोग्य विमा शिबिराचे १५ ते २२ मार्चदरम्यान आयोजन करण्यात आले असून या शिबिराचे उद्घाटन पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी झाले. या वेळी त्यांनी या उपक्रमाचे कौतुक करून नागरिकांनी शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.



पनवेल महापालिकेच्या माजी उपमहापौर तथा भाजप उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत यांच्या सौजन्याने नवीन पनवेल सेक्टर १५मध्ये रेल्वे स्टेशनसमोर आधारकार्ड शिबिर आणि आदित्य बिर्ला आरोग्य विमा शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात नवीन आधारकार्ड आणि आधारकार्डमध्ये सुधारणा करण्यात येणार आहेत. याशिवाय १८ ते ६५ वर्ष वयोगटातील नागरिकांना अवघे ५४९ रुपये भरून १० लाख रुपयांचा आरोग्य विमा काढण्यात येणार आहे.

शिबिराच्या उद्घाटन समारंभास भाजपचे जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, माजी उपमहापौर व जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत, चिटणीस ब्रिजेश पटेल, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, माजी नगरसेवक अजय बहिरा, माजी नगरसेविका ॲड. वृषाली वाघमारे, युवा नेते प्रतिक बहिरा, कामगार नेते रवी नाईक, कमलाकर घरत, जयराम मुंबईकर, किशोर मोरे, गुलाब थवई, सरोज मोरे, सुजाता पाटील, मेघा धमाल, प्रभा सिन्हा, प्रतिक पाटील, अर्चित घरत, इंडियन पोस्ट बँकेचे मॅनेजर सिद्धार्थ मुखर्जी, कल्याणी कुंभार, संकेत कांबळे आदी उपस्थित होते.

या वेळी माजी उपमहापौर चारुशीला घरत यांनी १५ ते २२ मार्चदरम्यान आयोजित केलेल्या या शिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

## वरंध घाटात एसटी बसचा अपघात

**महाड : प्रतिनिधी**

भोर-महाड मार्गावर वरंध घाटात शनिवारी (दि. १५) दुपारी एक एसटी बस दरीत कोसळली. ब्रेक निकामी झाल्याने हा अपघात झाला. या अपघातात १८ प्रवासी जखमी झाले आहेत.



रामदास पठार-महाड (एमएच २० बीएल ३८२२) एसटी बस सुनेभाऊ येथून महाडच्या दिशेने एसटी बस येत होती. वरंध घाटात पारमाची गावाच्या जवळ घाटात असलेल्या एका तीव्र वळणावर ब्रेक निकामी होऊन बस दरीत कोसळली. चालकाने प्रसंगावधान राखत बसवर नियंत्रण आणण्याचा आटोकाट प्रयत्न केला. यामुळे मोठी दुर्घटना टळली. या दुर्घटनेत जिवीत हानी झाली नाही, मात्र

### १८ प्रवासी जखमी

बसमधील १८ प्रवासी जखमी झाले आहेत.

अपघाताची माहिती मिळताच स्थानिक पोलीस, बचाव पथके घटनास्थळी दाखल झाली. त्यांनी बसमधील प्रवाशांना बाहेर काढले. जखमींना उपचारासाठी महाड येथील ट्रॉमा केअर रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.



दरम्यान, राज्याचे रोजगार हमी आणि फलोत्पादनमंत्री भरत गोगावले तसेच भाजप नेते प्रवीण दरेकर यांनी रुग्णालयात जाऊन जखमींची विचारपूस केली.

## घर बांधणाऱ्यांना पाच ब्रास मोफत वाळू!

**मुंबई : प्रतिनिधी**

[ सरकारचा निर्णय ]

राज्यात घरकुल बांधणाऱ्या लाखो लोकांना राज्य सरकारने खूशखबर दिली आहे. त्यांना मोफत पाच ब्रास वाळू मोफत देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असून या निर्णयाची घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली.

याबाबत प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की, ज्या ठिकाणी लिलाव झालेले नाहीत, ज्या ठिकाणी आम्हाला एन्व्हायरमेंट क्लियरन्स मिळाला आहे त्या ठिकाणी वाळू घाटांचे लिलाव होईल तसेच घरकुलांना पाच ब्रास मोफत रेती देण्याचा निर्णय महाराष्ट्र सरकारने घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा निर्णय घेतला आहे. त्यासाठीही आम्ही तरतूद करणार आहोत.

एकंदरीत जेवढी मागणी असेल, तेवढा पुरवठा असे वाळू धोरण आपण तयार करीत आहोत. त्यासाठी एम सँड धोरण येत आहे. यामध्ये दगड खाणींमधून येणाऱ्या वाळूसाठी आम्ही प्रत्येक जिल्ह्यामध्ये स्टो क्रशरसाठी प्रोत्साहन देत आहोत. त्या माध्यमातून दगडापासून मोठ्या प्रमाणात वाळू तयार होणार असून त्यामुळे नदीतील वाळूची मागणी कमी होईल तसेच येत्या दोन वर्षांत वाळूची मागणी आणि पुरवठा यामध्ये जी काही तफावत आहे ती दूर होईल, असेही महसूलमंत्री बावनकुळे म्हणाले.

## विद्यार्थिनीवर अत्याचार करणारा आरोपी गजाआड

**पनवेल : वार्ताहर**

कॉलेजला निघालेल्या एका अकरावीत शिकणाऱ्या विद्यार्थिनीवर इको गाडीचालकाने अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार पनवेलमध्ये समोर आला आहे. याबाबत पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होताच आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले.

अत्याचाराची ही घटना १० दिवसांपूर्वी घडली होती. सकाळी कॉलेजला निघालेल्या विद्यार्थिनीला बसस्टॉपवर सोडतो, असे सांगून आरोपीने आपल्या इको गाडीत बसविले आणि अज्ञातस्थळी गाडी घेऊन जात तिच्यावर अत्याचार केला. या प्रकाराने घाबरलेल्या विद्यार्थिनीने कुटूंबाला सांगितले नव्हते. अखेर ही बाब शनिवारी (दि. १५) सांगितल्यानंतर पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून आरोपीला अटक करण्यात आली. न्यायालयाने नराधमाला १८ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

## टँकरखाली सापडून एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

रस्त्याने चाललेल्या टँकरने अचानकपणे वळण घेतल्याने या टँकरच्या चाकाखाली स्कुटी गाडी येऊन त्यावरील तीन जणांचा मृत्यू झाल्याची घटना मुंबई-पुणे महामार्गावर पनवेल तालुक्यातील कोन गावाच्या हद्दीत शुक्रवारी (दि. १४) रात्री ११.३०च्या सुमारास घडली.

कामोठे सेक्टर १८मध्ये राहणारे शोबित सतीश सालुजा, त्यांची पत्नी जुई सालुजा व मुलगी लाडो सालुजा असे तिघे त्यांच्याकडे असलेल्या ॲक्टीव्हा स्कुटी गाडीने (एमएच ४६-बीएल ४४९६)वरून प्रवास करीत होते. त्यांची गाडी मुंबई-पुणे महामार्गावर कोन गाव हद्दीत आली असता समोरून जाणाऱ्या टँकर (एमएच ०४-केएफ ७४१७)वरील चालकाने अचानक वळण घेतल्याने शोबित सालुजा यांच्या ताब्यातील गाडी या टँकरच्या चाकाखाली आली.

या अपघातात दुचाकीवरील तिघेही गंभीररित्या जखमी होऊन मयत झाले. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## निवडक

### 'आयसिस'ला झटका! अबू खादीजाचा खात्मा

**अल अनबार :** अमेरिका आणि इराकच्या सुरक्षा यंत्रणांनी केलेल्या संयुक्त कारवाईत आयसिसच्या प्रमुख नेत्यांपैकी एक अब्दल्ला मक्की मुसलीह अल-रिफाई उर्फ अबू खादीजा याचा खात्मा झाला आहे. अबू खादीजा हा आयसिसचा दुसऱ्या क्रमांकाचा नेता होता आणि त्याच्याकडे जगभरातील कारवायांची जबाबदारी होती. इराकमधील अल अनबार येथे केलेल्या एअर स्ट्राइकमध्ये अबू खादीजा आणि आणखी एका आयसिस ऑपरेटीव्ह ठार झाला आहे.

### औरंगजेबाचे स्टेटस ठेवणाऱ्या १४ जणांवर गुन्हा दाखल

**सोलापूर :** औरंगजेबाच्या कबरीवरून सध्या राजकारण तापले आहे. अनेक संघटना, राजकीय नेत्यांनी औरंगजेबाची कबर उखडून फेकण्याची मागणी केली आहे. दरम्यान, सोलापूरच्या अक्कलकोट तालुक्यातील मैंदर्गी गावामध्ये औरंगजेबाचे स्टेटस ठेवणाऱ्या १४ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## चंद्रपूरमध्ये पाच युवकांचा तलावात बुडून दुर्दैवी मृत्यू



**चंद्रपूर : प्रतिनिधी**

चंद्रपुरात एक अत्यंत दु:खद घटना घडली आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील नागभीड येथील घोडाझरी तलावात पाच युवकांचा शनिवारी (दि. १५) बुडून मृत्यू झाला, तर एकाचा जीव वाचला आहे.

घोडाझरी या ठिकाणी ब्रिटिशकालीन तलाव आहे. तलाव व पर्यटनस्थळ असल्यामुळे येथे बारमाही पर्यटकांची गर्दी असते. शनिवार आणि रविवारी तलावावर बाहेरून पर्यटक येतात. अशाच प्रकारे चिमूर तालुक्यातील साठगाव कोलारी येथील जनक किशोर गावंडे, यश किशोर गावंडे, अनिकेत यशवंत गावंडे, तेजस बालाजी गावंडे, तेजस संजय ठाकरे आणि आर्यन हेमराज हिंगोली ही सहा मुले शनिवारी पर्यटनासाठी आली होती.

मुलांनी घोडाझरी तलावावर पर्यटनाचा आनंद घेतला. त्यानंतर सायंकाळी चारच्या सुमारास सहा मुले पोहण्याकरिता तलावात उतरली. ज्या ठिकाणी डोह होता त्या ठिकाणी ही सहाही मुले उतरले. त्यापैकी आर्यन हिंगोली कसाबसा वाचला, मात्र जनक गावंडे, यश गावंडे, अनिकेत गावंडे, तेजस गावंडे, तेजस ठाकरे ही पाचही मुले तलावात बुडाली व त्यांचा मृत्यू झाला.

मृतांमध्ये दोन सख्खे भाऊ आणि दोन चुलत भाऊ आणि एका मित्राचा समावेश आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहचले आणि आत पाचही जणांचे मृतदेह काढण्यात आले. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## मुंबई-गोवा महामार्गावर आज अवजड वाहतूक बंद


**अलिबाग : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावर रायगड जिल्ह्यातील कशेडी ते खारपाडादरम्यान रविवारी (दि. १६) अवजड वाहतूक बंद ठेवण्याचे आदेश रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले आहेत. जीवनाश्यक वस्तूंची वाहतूक करणाऱ्या वाहनांना या बंदीतून वगळण्यात आले आहे.

होळी व धुळीवंदन सण साजरा करण्यासाठी मोठ्या प्रमाणात कोकणवासीय रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यातील आपल्या मूळ गावी आले आहेत. त्याचबरोबर शनिवार व रविवार सार्वजनिक सुट्टी असल्याने पर्यटकदेखील रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात आले आहेत. हे सर्वजण रविवारी परत जाणार असल्याने वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे. कोकणवासीय व पर्यटक यांच्या परतीच्या प्रवासादरम्यान कोणत्याही प्रकारे अपघात घडू नये, वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी १६ मार्च रोजी दुपारी १२ वाजल्यापासून रात्री १२ वाजेपर्यंत मुंबई-गोवा महामार्गावर पोलादपूर तालुक्यातील कशेडी व पेण तालुक्यातील खारपाडा या दरम्यान तसेच खोपोलीवरून खोपोली-पाली फाटा ते वाकण या महामार्गावरून गोवा बाजूकडे जाणाऱ्या व मुंबई बाजूकडे येणाऱ्या अवजड वाहनांची वाहतूक बंद ठेवण्यात येईल.

दरम्यान, दूध, पेट्रोल, डिझेल, स्वयंपाकाचे गॅस, औषधे, ऑक्सिजन, भाजीपाला इत्यादी जीवनावश्यक वस्तू वाहून नेणारी वाहने, पोलीस वाहने, अग्निशमन वाहने, रुग्णवाहिका यांची वाहतूक सुरू राहील, असे जिल्हाधिकारी यांनी आपल्या आदेशात म्हटले आहे.

## निसर्गरम्य मुरुड परिसर



मुरुड : निसर्गरम्य मुरुड परिसर आगळ्यावेगळ्या सौंदर्याने नटलाय. येथील समुद्र, झाडे, डोंगर पर्यटकांना साद घालतात. लगतचा एकदरा पूल ते गोमुखमार्गे खोरा बंदर रस्ता तयार करून परिसराचे सुशोभीकरण केल्यास मुरुडचा गोल्डन नेकलेस पॉईंट म्हणून नावलौकिक मिळवेल. (छाया : सुधीर नाझरे)




# वादग्रस्त स्टेट्स ठेवणाऱ्यावर गुन्हा

## तळोजात तंत्रज्ञानाचा चुकीचा वापर एकाच्या अंगलट

**पनवेल : वार्ताहर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी संदेश द्वारे चुकीचे आणि दोन समाजात तेढ निर्माण करणारे विधान करत असल्याची बनावट चित्रफीत मोबाईलवर स्टेटस ठेवणाऱ्या व्यक्तीच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पनवेलमधील घोट कॅम्प तळोजा येथे राहणारा मुख्तार नूरमहंमद सैय्यद याने मोबाईलवर पंतप्रधान नरेंद्र मोदी हे संदेश देत असल्याचे स्टेटस ठेवले होते.

गुन्हे

मात्र या स्टेट्स मध्ये तंत्रज्ञानाचा वापर करून मूळ संदेश सोडून दुसराच संदेश दिल्याचे दिसून आले. पंतप्रधान मोदी यांच्या तोंडी चुकीची धार्मिक विधाने, भारतातील हिंदू धर्मीय लोकांच्या हिंदी समाजाच्या धार्मिक भावना दुखावण्याचा तसेच दोन समाजात तेढ निर्माण करण्याच्या उद्देशाने ही चित्रफीत स्टेटस वर ठेवण्यात आला.

ही बाब सीबीडी पोलिसांच्या निदर्शनास आल्यावर सय्यद याला चौकशीसाठी बोलावण्यात आले, मात्र त्याने चौकशी पूर्वीच ती चित्रफीत स्टेटसवरून काढून टाकली तसेच मोबाईलमधून डिलीट केली. त्यामुळे पोलिसांनी पंतप्रधान यांची बनावट चित्रफीत समाज माध्यमातून प्रसारित करणे, ज्यामुळे दोन समाजात तेढ निर्माण होईल, तसेच पुरावा नष्ट करणे कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# करंजाडेत एकाची हत्या

## डोक्यात दगड घातला; आरोपी अटकेत

**पनवेल : वार्ताहर**

अज्ञात करणावरून आपल्या सहकाऱ्याच्या डोक्यात २० किलो वजन टाकून त्याची हत्या केल्याची घटना करंजाडे येथे घडली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मृत अनिल सुदामा बिंद उर्फ गुड्डू (वय २९ राहणार उत्तर प्रदेश) हा ताराचंद गुप्ता यांच्या करंजाडे सेक्टर दोन ए चैतन्य श्री समर्थ कृपा सोसायटीत असलेल्या फॅब्रिकेशनच्या दुकानात कामगार म्हणून काम करत होता. तर त्यांच्याकडे काम करणारा दुसरा कामगार धरम गोपाल राय यांच्यात यापूर्वी वाद होत होते. १४ मार्च रोजी सायंकाळी साडे सातच्या सुमारास त्यांच्यात वादावाद झाले आणि आरोपी धरम याने दुकानातील २० किलो वजन अनिल सुदामा बिंद उर्फ गुड्डू यांच्या डोक्यात मारले. यात अनिल सुदामा बिंद हा जखमी झाला आणि त्यात त्याचा मृत्यू झाला.

या घटनेची माहिती पनवेल शहर पोलिसांना मिळताच वपोनि नितीन ठाकरे, निरीक्षक शाकीर पटेल, सपोनि घेवडेकर, केदार, उपनिरीक्षक शेलार, सोळंके आदींच्या पथकाने या ठिकाणी धाव घेवून तात्काळ आरोपीला ताब्यात घेतले आहे. आरोपीने कोणत्या प्रमुख कारणावरून सहकार्याची हत्या केली याचा पुढील शोध सहाय्यक निरीक्षक घेवडेकर करीत आहेत.

## निवडक

### ट्रेलर अपघातात चालकाचा मृत्यू

**पनवेल :** ट्रेलरवरील ताबा सुटल्याने ट्रेलर वडाच्या झाडाला धडकला आणि ट्रेलरवरील चालक पाटेश्वर रामबेलास याचा मृत्यू झाला. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली. ट्रेलर (एमएच ४६ बीबी १९२१) वरील चालक पाटेश्वर रामबेलास (३८, रा. बस्ती उत्तर प्रदेश) हा त्याच्या ताब्यातील ट्रेलर भरधाव वेगाने घेऊन जात होता. कोन, रसायनी सिमेंट रोड देवळोली गावच्या १०० मीटर अगोदर त्याचा ट्रेलरवरील ताबा सुटला आणि रस्त्याच्या कडेला असलेल्या वडाच्या झाडाला ठोकर मारून अपघात झाला. या अपघातात ट्रेलर पलटी झाला आणि चालक पाटेश्वर रामबेलास हे गंभीर जखमी होऊन त्यात त्याचा मृत्यू झाला.

### नोकराने केली ५० हजारांची चोरी

**पनवेल :** कॅन्टीनमध्ये काम करत असलेल्या नोकराने ५० हजाराची चोरी केल्याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. विशाल गजघाटे हे कॅन्टीन चालवतात. कॅन्टीनमध्ये रामचंद्र उर्फ संतोष उपाध्याय याला कामाला ठेवले आहे. यांनी पन्नास हजार रुपये लॉकर मध्ये ठेवले होते आणि संतोष याच्याकडे कार्यालयात झोपण्यासाठी चावी दिली. ते कार्यालयात आले असता रामचंद्र उर्फ संतोष हा चावी ठेवून निघून गेलेला होता. लॉकर उघडले असता ५० हजार रुपये मिळून आले नाहीत. त्याने चोरी केल्याचे उघडकीस आल्यानंतर त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

### घरफोडीत लाखोंचा ऐवज लंपास

**पनवेल :** केवाळे येथील अभिनंदन क्लोरीस सोसायटीत केलेल्या घरफोडीत चोरट्यांनी एक लाख ८८ हजार रुपये किमतीचा मुद्देमालाची चोरी केली. या प्रकरणी पनवेल तालुका पोलीस अधिक तपास करत आहेत. वाघमारे या घराला लॉक लावून आकुर्ली येथे क्लास घेण्यासाठी गेल्या होत्या. क्लास संपवून घरी आले असता घराचा लॉक तुटलेला अवस्थेत दिसला आणि घरातील सामान अस्ताव्यस्त पडलेले होते. त्यांनी पाहणी केली असता रोख रक्कम, सोन्याचे नेकलेस आणि चांदीचे पैंजण चोरीला गेल्याचे दिसून आले.

### खारघरमध्ये साडी वॉकेथॉन

**पनवेल :** 'महिला दिन'चे औचित्य साधून मराठी ब्राह्मण समाज, खारघर यांच्या वतीने 'साडी वॉकेथॉन'चे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रम रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल येथून सुरू झाला. यानंतर दोन किलोमीटर 'वॉकेथॉन' करून सांगतादेखील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कुल जवळ झाली. या वेळी उपस्थित महिलांकरिता लकी ड्रॉ काढण्यात आला. त्यातील विजेत्याला साडी आणि पारंपरिक पध्दतीने बनवलेली ज्वेलरी देण्यात आली.



# सा. रायगड सम्राटचा वर्धापन दिन उत्साहात

## ◆ आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते विशेषांक प्रकाशन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शंकर वायदंडे संपादित रायगड सम्राट न्यूज वेब पोर्टलच्या तृतीय वर्धापन दिनानिमित्त विशेषांकाचा प्रकाशन आणि रायगड सम्राट पुरस्कार वितरण सोहळा आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते (दि.१५) मोठ्या उत्साहात नवीन पनवेल येथे झाला.



या वेळी रायगड सम्राटचा गान सम्राट पुरस्कार प्रसिद्ध गायक रवींद्र जाधव, उद्योग रत्न पुरस्कार प्रयाग बिल्डरचे प्रदीप भोपी, समाजरत्न पुरस्कार मेहबूब याकूब शेख, उत्कृष्ट निवेदक म्हणून प्रवीण मोहोकर, तर क्रीडा क्षेत्रासाठी उत्कृष्ट कबड्डीपटू कु. तेजस्विनी इंगोले हिला पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.

नील हॉस्पिटलच्या सभागृहात झालेल्या या सोहळ्यास या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, माजी नगरसेवक अजय बहिरा, डॉ शुभदा निल, ज्येष्ठ पत्रकार गणेश कोळी, निलेश सोनवणे, भाजपा नेरे विभागीय अध्यक्ष सुनील पाटील, युवा नेते प्रतीक बहिरा, भारत भोपी, पत्रकार मयूर तांबडे, संतोष भगत, गणपत वारगडा, संतोष आमले, संतोष सुतार, अनिल कुरघोडे, आप्पासाहेब मगर, रवींद्र पाटील, अण्णासाहेब आहेर,अक्षय कांबळे सचिन भोळे, विजय इंगोले, अशोक आखाडे, विशाल सावंत मुकुंद कांबळे, कैलास नेमाडे, अक्षय भगत आदी उपस्थित होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी यांनी रायगड सम्राट चे कौतुक करत तृतीय वर्धापन दिनानिमित्त संपादक शंकर वायदंडे यांना शुभेच्छा दिल्या तसेच शंकर वायदंडे रायगड सम्राटच्या माध्यमातून समाजाचा आरसा समोर ठेवत असून समाजाला दिशा देण्याचे काम करत असल्याचे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी करत पुरस्कार प्राप्त मानकरींचे अभिनंदनही केले.

# वीर वाजेकर महाविद्यालयात ग्राहक हक्क दिन उत्साहात

**उरण : वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील फुंडे येथील वीर वाजेकर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय फुंडे च्या इचड आणि BAF विभागाच्या वतीने जागतिक ग्राहक हक्क दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना ग्राहक हक्क, जबाबदाऱ्या आणि ग्राहक कायदेशीर संरक्षणाविषयी जागरूक करणे हा होता.



या कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी पोस्टर सादरीकरणाच्या माध्यमातून ग्राहक संरक्षण कायदे, प्रामाणिक व्यापार पद्धती, भ्रामक जाहिराती आणि नैतिक व्यवसाय आचारसंहिता यासंदर्भात माहितीपूर्ण सादरीकरण केले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रभारी प्राचार्य डॉ. अमोद ठक्कर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले. आजच्या ग्राहकप्रधान युगात प्रत्येकाने आपल्या हक्कांची आणि जबाबदाऱ्यांची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. हा उपक्रम विद्यार्थ्यांना ग्राहक संरक्षणाविषयी जागरूक करण्यास मदत करेल आणि त्यांना सुजाण ग्राहक बनवेल.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी बीएमएस विभागप्रमुख भूषण ठाकूर आणि प्राध्यापिका प्रियांका ठाकूर, दीक्षिता म्हात्रे, रेणू सरोज आणि आरती पाटील यांनी विशेष मेहनत घेतली.

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी ग्राहक विषयक समस्या आणि त्यावरील उपाययोजना यावर चर्चा केली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना व्यावहारिक शिक्षण आणि ग्राहक हक्कांबद्दल जागरूकता मिळाली, तसेच त्यांनी नवीन कौशल्ये आत्मसात करण्याची संधी मिळवली. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे आणि सर्जनशील सादरीकरणामुळे हा उपक्रम अत्यंत यशस्वी ठरला.

# कामगार नेते संजय पवार यांना 'कोल्हापूररत्न'

**पनवेल : वार्ताहर**

कामगार क्षेत्रात अल्पवधीत आपल्या कामाचा ठसा उमटविणारे कामगार नेते संजय कलावती वासुदेव पवार यांना नुकताच कोल्हापूर रत्न २०२५ हा पुरस्कार देवून गौरविण्यात आले.



संजय पवार यांनी मागील २५ वर्ष कामगार व सामाजिक क्षेत्रात काम केले आहे. विविध आंदोलने केली आहेत. तसेच माता भगिनींवर होणाऱ्या अन्यायाविरोधात आवाज उठवून त्यांना न्याय मिळवून दिला आहे. कायदेशीर मदत, व्यसनमुक्ती, निराधार महिलांना मदत आदी केलेल्या उल्लेखनिय कामगिरीची दखल पनवेल या ठिकाणी कोल्हापूर रहिवाशी संघाकडून घेण्यात आली.

आमदार प्रशांत ठाकूर, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, इंडाल कंपनीचे रिटायर्ड जनरल मॅनेजर एस.टी. नाईक आदींच्या उपस्थितीत विशेष कार्यक्रमात त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आले.

# चैत्र महिन्याच्या पार्श्वभूमीवर वृक्षांच्या पानांना बहर

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

ऐन मार्चच्या मध्यान्हापासून उन्हाचा पारा वाढल्याने चटका जाणवायला लागला असतानाच निसर्गाच्या सानिध्यात असणारे वृक्ष हिरवेगार झाल्यचे पहावयांस मिळत आहे, मात्र तप्त उन्हात निसर्गाकडून सुरू असलेली रंगीबेरंगी फुलांची ही सृष्टी पाहून मनाला समाधान मिळत आहे. निसर्गाच्या प्रकोपाने खचलेल्या बळीराजाला जणू जगण्याची नवी उमेद देण्यासाठी हा निसर्ग पुन्हा आपल्या आविष्काराची उधळण करत असल्याचा भास परिसरात ठिकठिकाणी अनुभवायला येत आहे.

चैत्र महिन्याच्या स्वागतासाठी संपुर्ण निसर्ग बेचैन झाला आहे. फाल्गुन संपत, पानगळत सरली निसर्गाच्या सानिध्यात नवसंजीवनी पांघरली... ऋतुराजाची चाहूल, झाडावेलींना लागली... या ओळीचा प्रत्यय रसायनी पाताळगंगासह खालापूर तालुक्याच्या परिसरात ठिकठिकाणी पाहावयास मिळत आहे. एकीकडे सूर्य आग ओकत असताना झाडांना फुटणारी कोवळी पाने मनाला गारवा देऊन जात आहे. तप्त उन्हात,रूई, रिठा, कडूलिंब, आंबा,जांभूळ आदी झाडे पाना फुलांनी रंगून गेली आहे. या झाडावरती कोवळी पाने प्रत्येकाचे मन आकर्षिले जात आहे.

ही चैत्राची उधळण बळीराजाला जगण्याची नवी उमेद देऊन जात आहे. ऋतुराजाच्या स्वागतासाठी निसर्ग श्रृंगार वाढवून सज्ज झाल्याचे चित्र रसायनी पाताळगंगा परिसरात दिसत आहे.
















**पनवेल : शिवाजीनगर येथे ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष कृष्णाशेठ ठाकूर यांच्या हस्ते होळीचे पूजन करण्यात आले. या वेळी गजानन ठाकूर, विजय ठाकूर, श्रीधर ठाकूर, पांडुरंग ठाकूर, हिरालाल ठाकूर, किशोर ठाकूर, सुजित ठाकूर, शनिदास ठाकूर, धनाजी ठाकूर, राजू ठाकूर, पांडू कडू, रतन ठाकूर, निलेश ठाकूर, शिवाजी ठाकूर, दर्शन ठाकूर, किसन मोकल, नारायण ठाकूर, शशी ठाकूर, अंनंदी ठाकूर, नंदा ठाकूर, मालती ठाकूर यांच्यासह असंख्य मुले, महिला, पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

# उन्हाच्या दाहकतेमुळे माठाला मागणी वाढली

**पनवेल : वार्ताहर**

मार्च महिन्याच्या सुरुवातीला उन्हाच्या झळा हळूहळू चांगल्याच वाढू लागल्या आहेत. पनवेल तालुक्यात मागील १५ दिवसांपासून उन्हाचा पारा चढण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे गरिबांचे फ्रीज म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मातीच्या माठाला दिवसेंदिवस मागणी वाढली आहे. कुंभार व्यावसायिकांच्या वर्षभर केलेल्या अपार कष्टांनतर बनविण्यात येणाऱ्या माठांना उन्हाळ्यात मोठ्या प्रमाणात मागणी असते. पनवेल शहरातल्या बाजारपेठेत तसेच ग्रामीण भागातल्या आठवडे बाजारात कुंभारांकडून माठाची विक्री केली जात आहे.



आता तयार माठ विक्रीच्या व्यवसायात परप्रांतीयांनी देखील शिरकाव केला आहे. ते मातीचे माठ विकण्यासाठी गावागावात फिरस्ती करीत आहेत. उन्हाच्या झळा वाढू लागल्याने नागरिकांना आता थंड पाण्याची आवश्यक्ता भासू लागली आहे. दरवर्षीप्रमाणे गरिबांचे फ्रिज म्हणून ओळख असलेल्या माठाचे बाजारात आगमन झाले आहे, मात्र माठासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या किमतीत काही प्रमाणात वाढ झाल्याने यंदा माठाच्या दरातसुद्धा २० टक्क्यांची वाढ झाल्याचे माठ विक्रेत्याने सांगितले. मागील वर्षीच्या तुलनेत या वर्षी माठांची किंमत ३५० ते ५०० रुपयांपर्यंत पोहचली आहे. शहरातील लहान-मोठ्या आकारातील लाल, काळ्या रंगाचे माठ, रांजण आणि नळ लावलेले माठ विक्रीसाठी दाखल झाले आहेत. त्यातच उन्हाचा कडाका वाढल्याने माठांची मोठ्या प्रमाणावर विक्री होत आहे.

होळीनंतर माठांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढते. त्यामुळे गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा किमती २० टक्क्यांनी वाढल्या आहेत. बदलत्या काळानुसार थंडगार पाण्याच्या माठाची जागा विविध प्रकारच्या साधनांनी घेतली आहे. त्यामुळे काही प्रमाणात माठ विक्रीवर परिणाम देखील झाला आहे. माठातील पाणी आरोग्यासाठी चांगले असल्याने ग्राहकांनी आता फ्रिजऐवजी ग्राहक माठाला पसंती देताना दिसत आहे.

सध्या बाजारात रंगी बेरंगी माठ विक्रीसाठी उपलब्ध असून अनेक ठिकाणी नळ लावलेले माठ सुद्धा विकायला ठेवण्यात आले आहेत.

# थिएटर सिनेमाचे, प्रयोग नाटकाचा...

मुंबईतील प्रभादेवी येथील पु.ल. देशपांडे कला अकादमी संकुलातील रवींद्र नाट्यमंदिर आता अतिशय अद्ययावत व आधुनिक तांत्रिक सुवाधांसह सज्ज झाले असून तेथे आता रंगभूमीवर नाटक, एकांकिका, वाद्यवृंद, काही महत्त्वाचे सोहळे (इव्हेन्टस) आपल्याला पहायला मिळणार आहेत तसेच आता तेथे आवश्यकतेनुसार रूपेरी पडद्याचीही व्यवस्था करण्यात आली असून तेथे मराठी चित्रपटदेखील पहायला मिळणार आहेत. नाट्यगृहात चित्रपट अशी ही कल्पना आहे. दादर, प्रभादेवी, वरळी या परिसरातील मराठी चित्रपट रसिक प्रेक्षकांकडून या गोष्टीला निश्चितच सकारात्मक उत्फूर्त प्रतिसाद मिळेल.

नाट्यगृहात चित्रपट दाखविण्यात यावेत अशी विविध संघटनांकडून काही महिन्यांपासून होत असलेल्या मागणीला पुणे शहरातील नाट्यगृहात आयोजित करण्यात आलेल्या चित्रपटांच्या खेळास मिळालेल्या प्रतिसादावरून उत्साह वाढला आहे.

पुणे महानगरपालिकेने नाट्यगृहांमध्ये सिनेमा पाहण्यासाठी पडदा बसविण्याचा विचार केला असून येणाऱ्या अर्थसंकल्पामध्ये तशी तरतूददेखील करणार आहे, पुणे शहरातील औंध येथील पं. भीमसेन जोशी, घुले रोड येथील पं. जवाहरलाल नेहरू आणि येरवडा येथील अण्णाभाऊ साठे या तीनही नाट्यगृहांमध्ये पडदा बसविण्याचे पुणे महानगरपालिकेने ठरविले आहेत, असेही एक वृत आहे.

नव्वदच्या दशकात मुंबईत असा एक प्रयत्न झाला होता. गिरगावातील साहित्य संघ मंदिर, धोबीतलाव येथील रंगभवन येथे दररोज सायंकाळी मराठी चित्रपट दाखविण्यात येत होता. वृत्तपत्रातून तशी बातमी व चित्रपटाच्या जाहिरातीदेखील प्रसिद्ध झाल्या, पण तेव्हा या प्रयत्नात चित्रपटाची एक प्रिंट अडकून पडते असे दिसून आल्याने ते प्रदर्शन थांबविण्यात आले. आज डिजिटल युगात आपण आहोत, आज मराठी चित्रपटांची निर्मिती फार वाढलीय, बजेट वाढलंय, रसिक प्रेक्षक मराठीतील वेगळ्या विषयांचे स्वागत करतोय, जवळपास प्रत्येक आठवड्यात विविध माध्यम समूह इत्यादींकडून आकर्षक व देखण्या मनोरंजन क्षेत्रासाठीच्या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात येत आहे. प्रसार माध्यमातून मराठी चित्रपटांना भरघोस प्रसिद्धी मिळतेय, मराठी चित्रपट रसिक आज नाट्यगृहात चित्रपट पाहू इच्छितोय. त्यामुळे आता रंगभूमीवर चित्रपट ही गोष्ट लोकप्रिय होईल.

मुंबईतील इंग्रजकालीन चित्रपटगृह ही मुळात असा एक फ्लॅशबॅक यानिमित्त सांगावासा वाटतो. एखाद्या नाटकात (विशेषतः फॅन्टसी नाटकात) एकादी व्यक्तिरेखा स्टेजवर चक्क खालून प्रवेश करते. म्हणजे जमिनीतून ती व्यक्तीरेखा येते. पूर्वी एकाद्या पौराणिक नाटकातही असा नाट्यमय प्रसंग असे आणि त्यासाठी त्या नाट्यगृहाच्या रंगमंचाची रचना असे. हे वेगळ्या संदर्भात येथे सांगतोय. आज तुम्ही धोबीतलाव येथील इंग्रजकालीन एडवर्ड थिएटरला भेट दिली, तुम्हाला तेथे पडद्यासमोर अशा पद्धतीने एखाद्या व्यक्तिरेखेचा प्रवेश होऊ शकतो अशी रचना दिसेल आणि तुम्ही जर आपले कुतूहल पूर्ण करण्यासाठी त्याच पडद्यामागे तळघरात गेल्यास तेथे तुम्हाला तेथून पडद्यासमोर येणारी अथवा नेणारी अशी छोटीशी लिफ्ट दिसेल. अगदी आजही ती लिफ्ट कायम आहे हे विशेषच आहे. अशी तेथे लिफ्ट का? तर एडवर्ड हे मूळचे नाटकाचे थिएटर आहे. त्या काळातील अशा वास्तूत मराठी, हिंदी,



इंग्लिश नाटकांचे प्रयोग, जादूचे प्रयोग, वाद्यवृंद यांचे आयोजन करण्यात येई. १९१४ साली ते सुरू झाले आणि आजही तेथील खेळ चालू नसला तरी ही इमारत उभी आहे. एडवर्ड चित्रपटगृह दोन मजली. (अथवा दोन बाल्कनी) त्यातील सर्वात वरच्या मजल्यावरील बाल्कनीची अनेक वर्ष महिला प्रेक्षकांना तिकीटे न देण्याची प्रथा होती. याचे कारण तेथे जाण्यासाठीच्या पायरीवर कोणा स्त्री प्रेक्षकाची साडी अथवा अन्य पोषाख अडकू नये अशीच त्यामागची भावना. एडवर्ड हे प्रामुख्याने रिपीट रन चित्रपटासाठीचे म्हणून ओळखले जाई. मी गिरगावात राहताना अनेक तरी जुने चित्रपट याच एडवर्डला रिपीट रनला रिलीज झाल्यावर पाहिले. एडवर्डला काही नवीन चित्रपटही प्रदर्शित होत. 'जय संतोषी मा' (रिलीज ३० मे १९७५)ने येथे खणखणीत ज्युबिली हिट यश संपादले. मूळ नाट्यगृहात चित्रपट रूजत गेला.

**झूम प्रहर**




**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

विशेषतः दक्षिण मुंबईतील काही जुनी एकपडदा थिएटर अर्थात सिंगल स्क्रीन थिएटर्स ही अगदी सुरुवातीच्या काळात नाटक, मनोरंजनाचे विविध कार्यक्रम, जादूचे प्रयोग, वाद्यवृंद यासाठीच होती आणि त्या काळाशी ते सुसंगत असेच ते होते. आणि त्या काळात प्रामुख्याने शनिवार रविवार अशा दोनच दिवशी नाट्यप्रयोग होत.

आपल्या देशात चित्रपटाचा पहिला खेळ ७ जुलै १८९६ साली झाला. म्हणजे त्याला आता सव्वाशे वर्षांचा कालावधी झाला आहे. फ्रान्सच्या ल्युमिए बंधुंनी मुंबईच्या वॅटसन हॉटेलमध्ये 'अरायव्हल ऑफ ट्रेन' हा काही मिनिटांचा खेळ दाखवला. त्या काळात चित्रपट ही कला आपल्याकडे ज्ञात नव्हती. चालती फिरती चित्रे अशा दृष्टिकोनातून त्याकडे पाहिले जाई. त्यामुळे चित्रपटगृह ही संकल्पनाही नव्हती. नाटक आणि संगीत (आणि त्यात संगीत नाटकही) तसेच स्टेजवरचे मनोरंजन हळूहळू रूजत होते आणि त्यानुसार 'नाट्यगृह' उभी राहिली.

आज जेथे न्यू एक्सलसियर थिएटर आहे. तेथे विसाव्या शतकाच्या सुरुवातीला नॉव्हेल्टी नावाचे असेच एक नाट्यगृह होते असा एक संदर्भ आहे. ते पाडून १९१० साली एक्सलसियर हे चित्रपटगृह उभारले आणि मग तेही पाडून १९७५ साली न्यू एक्सलसियर उभे राहिले. अशा पद्धतीने मूळ नाट्यगृह असणे असे आणखी काही चित्रपटगृहाबाबत दिसतेय. न्यू एक्सलसियर चित्रपटगृहात ५ मार्च १९७५ रोजी शक्ती सामंता दिग्दर्शित अमर प्रेम (१९७२) या चित्रपटाचा विशेष खेळ आयोजित करण्यात येऊन त्याचे उद्‌घाटन झाले, तर ७ मार्च १९७५ रोजी राज खोसला दिग्दर्शित 'प्रेम कहानी' प्रदर्शित होत ते चित्रपट रसिकांसाठी खुले करण्यात आले. न्यू एक्सलसियरच्या इमारतीतील चौथ्या मजल्यावर मिनी थिएटर होते. मुंबईतील आम्हा चित्रपट समीक्षकांसाठी याच मिनी थिएटरमध्ये मराठी व हिंदी चित्रपटांचे खेळ आयोजित केले जात. नव्वदच्या दशकाच्या मध्यास ते बंद झाले. 'अबोध'च्या प्रेस शोला माधुरी दीक्षित, तर 'हीरो'च्या प्रेस शोला जॅकी श्रॉफ आल्याचे मला चांगलेच आठवत आहे.

दक्षिण मुंबईतीलच रॉयल ऑपेरा हाऊसहेदेखील मूळचे इंग्रजकालीन असे अतिशय देखणे असे नाट्यगृहच. लंडनचा जसा 'ऑपेरा' आहे तसाच तो मुंबईत असावा अशा संकल्पनेतून १९११ साली त्याची उभारणी केली आहे. पाचवा किंग जॉर्जच्या हस्ते तेव्हा या वास्तूचे उदघाटन झाले. दोन बाल्कनी असलेल्या या वास्तूच्या तळमजल्यावर म्हणजे स्टेजच्या अगदी समोरच्या आसनव्यवस्थेत दोघांच्या मध्ये थोडेसे अंतर राखले होते, तर दोन्ही बाजूला आणि मागे मिळून बॉक्सची व्यवस्था केली गेली. काही बॉक्समध्ये दोन तर काही बॉक्समध्ये चार अथवा सहा अशी सहकुटुंब आनंद घ्यावा अशी व्यवस्था. मुख्य वास्तूबाहेर असलेल्या प्रशस्त मोकळ्या जागेत त्या काळात उच्चभ्रू रसिक व्हिक्टोरियामधून ऐटीत येत.



एकदम साहेबी थाटाची वास्तू ही याची खासियत आजही कायम आहे. बाहेरच एका बाजूला ऑपेरा हाऊस फाऊन्टन सोडा या नावाचे उपहारगृह. तेथील केक आणि खारी प्रसिद्ध होती. अशा या एकेकाळच्या नाट्यगृहात १९१२ साली अमेरिकन जादुगर रेमण्डस यांचा खेळ झाला. फ्रेन्च पॅथे यांच्या मनोरंजन खेळांचे आयोजन झाले. ॲन्डरसन यांच्या नाटकाचे प्रयोग रंगले. इतकेच नव्हे; तर याच वास्तूत बालगंधर्व, मा. कृष्णराव, किर्लोस्कर, दीनानाथ मंगेशकर यांच्याही नाटकाचे प्रयोग रंगले. लता मंगेशकर यांनी आपला पहिला गाण्याचा कार्यक्रम याच ऑपेरा हाऊसमध्ये साजरा केला. पृथ्वीराज कपूर यांच्या 'पठाण' वगैरे नाटकाचे प्रयोग रंगले. त्या काळात वातानुकुलीत असा काही प्रकार नव्हता. कार्यक्रम रंगणे जास्त महत्त्वाचे होते. १९३० सालापासून येथे मूकपट प्रदर्शित करण्यास सुरुवात केली आणि मग १९३५ सालापासून नियमितपणे हिंदी चित्रपट प्रदर्शित होऊ लागले. मूळ दोन बाल्कनी कायम ठेवूनच हा प्रवास सुरू झाला आणि १९९३ सालापर्यंत तो चालू होता. त्यानंतर ते काही कारणास्तव बंद झाले आणि आता २०१६ साली पुन्हा एकदा सुरु झाले . आता ते वातानुकूलित आणि अतिशय देखणे असे आहे. आणि विशेष म्हणजे येथे मामी चित्रपट महोत्सवाचे आयोजन करण्यात आले तरी आता तेथे प्रामुख्याने हिंदी आणि इंग्रजी नाटकाचे प्रयोग होतात. म्हणजे मूळ नाट्यगृह आता पुन्हा नाट्यगृह म्हणूनच कार्यरत आहे. एक वर्तुळ पूर्ण झाले म्हणायचे. ऑपेरा हाऊस चित्रपटगृहात सरस्वतीचंद्र, उपकार, दो रास्ते, शोर, रोटी कपडा और मकान, अमर अकबर ॲन्थनी, मौसम, देवता, बरसात की रात अशा अनेक चित्रपटांनी रौप्य वा सुवर्ण महोत्सवी यश संपादले. सतिश कुलकर्णी निर्मित व सचिन पिळगांवकर दिग्दर्शित नवरी मिळे नवऱ्याला हा येथे प्रदर्शित झालेला एकमेव मराठी चित्रपट. त्याने चक्क चार आठवड्यांचा मुक्काम केले..नव्वदच्या दशकात तेथील चित्रपट प्रदर्शित होणे स्थगित झाल्यावर तेथे अनेक चित्रपटांचे चित्रीकरण करण्यात आले. एन. चंद्रा दिग्दर्शित 'वजूद'ची नाना पाटेकर व माधुरी दीक्षित यांच्यावरील काही महत्त्वाची दृश्ये येथेच चित्रीत करण्यात आली. तेव्हा माझे सेटवर जाणे झाले होते. आता ते नव्याने सज्ज झाल्यावर प्रसाद ओक दिग्दर्शित चंद्रमुखी (२०२२)चा पहिला इव्हेंट या ऑपेरा हाऊसच्या रंगमंचावर




छान रंगला. काही हिंदी चित्रपटांचेही इव्हेंट येथे होत असतात. काही मराठी नाटकांचे प्रयोग येथे आयोजित करण्यात येताच त्यातील कलाकारही ऑपेरा हाऊसच्या अनुभवाने प्रभावित होतात. ऑपेरा हाऊस या वास्तूला स्वतःचे अस्तित्व आहे, ओळख आहे, इतिहास तर आहेच आहे. पूर्वी ऑपेरा हाऊस चित्रपटगृहावरचे भव्य दिमाखदार डेकोरेशन पहायलाही गर्दी होई. ते दिवसच वेगळे होते. वातावरण वेगळे होते.

शंभर सव्वाशे वर्षांपूर्वी प्रामुख्याने शनिवार व रविवार अशा दोनच दिवशी नाटकाचे प्रयोग होत. त्यामुळे नाट्यगृहांची संख्यावाढ हा महत्त्वाचा घटक नव्हताच. अशातच विदेशातून मूकपट येऊ लागले. तेही वीस मिनिटे ते एक तासाचे असत. आणि त्याचे खेळ अगदी तंबूतही होत. आपल्याकडे दादासाहेब फाळके यांनी निर्माण केलेला पहिला मूकपट 'राजा हरिश्चंद्र' हा ३ मे १९१३ रोजी गिरगाव परिसरातील कॉरोनेशन चित्रपटगृहात प्रदर्शित झाला आणि आपल्याकडे व्यावसायिक पातळीवरील चित्रपट प्रदर्शित होणे सुरु झाले. सुरुवातीला असेच काही मूकपट निर्माण झाले आणि मग चित्रपती व्ही. शांताराम यांच्या 'अयोध्येचा राजा' (६ फेब्रुवारी १९३२ रोजी प्रदर्शित झाला) पासून मराठी बोलपटाची निर्मिती सुरू झाली. दिग्दर्शक अर्देशीर इराणी यांनी 'आलम आरा' (१९३१) हा पहिला हिंदी बोलपट निर्माण केला. हे दोन्ही चित्रपट आमच्या गिरगावातील मॅजेस्टिक सिनेमागृहात प्रदर्शित झाले. ते मूकपटाच्या काळापासून कार्यरत होते. आज त्या जागी उंच इमारत उभी असून मॅजेस्टिक सिनेमागृहाच्या कोणत्याही खाणाखुणा शिल्लक नाहीत.

या प्रवासात दक्षिण मुंबईतील डॉ. भडकमकर मार्गावरील (पूर्वीचा लॅमिन्टन रोड) पाथे (नंतरचे स्वस्तिक. नंतर ते बंद), इम्पिरियल थिएटर येथे अगदी सुरुवातीला एखाद्या नाटकाचा अथवा मनोरंजनाच्या खेळाचे आयोजन होई. चित्रपटगृहांचा इतिहास असा खोलवर आहे. तीस आणि चाळीसच्या दशकात दक्षिण मुंबईत कुलाबा परिसरात गॅरीसन, तर धोबी तलाव परिसरात सेंट झेवियर्स, वेलिंग्टन या नावाची एकाच वेळेस कधी इंग्रजी नाटक, तर कधी इंग्रजी चित्रपट प्रदर्शित करण्याची थिएटर होती. ती काळाच्या ओघात बंद पडली आहेत. त्यांची नोंदही फारशी सापडत नाही. चित्रपटाच्या इतिहासाप्रमाणेच चित्रपटगृहाचाही इतिहास महत्त्वाचा. त्या माध्यमातून चित्रपट रसिकांपर्यंत पोहचत राहिलाय. बायस्कोप ते ओटीटी असा तो मोठाच प्रवास आहे.

मूळ नाटकाची असलेल्या एडवर्डची वास्तू मात्र शंभर वर्षांपूर्वीच्या उत्तम आणि मजबूत बांधकामाचा प्रत्यय देते. ऑपेरा हाऊस तर एक प्रकारची इंग्रजकालीन रचनेची आठवण देणारी देखणी वास्तू आहे.

अशी चित्रपटगृहे मूळची नाट्यगृह आहेत. त्यात वावगं असं काही नाही. याचे कारण म्हणजे नाटक या माध्यमाची दृश्य माध्यमातील तांत्रिक प्रगती म्हणजे चित्रपट अशीच या कलेची सुरुवात झाली आणि अगदी सुरुवातीच्या काळात काही चित्रपटांवर नाटकाचा प्रभाव होता ही वस्तुस्थिती आहे... आणि आता मनोरंजन क्षेत्र अतिशय व्यापक व चौफेर वाटचाल करीत असतानाच नाट्यगृहात चित्रपटाचाही पडदा असावा या टप्प्यापर्यंत आपण येऊन पोहचलो आहोत. तालुक्याच्या ठिकाणी नवीन मनोरंजन संकुल उभारताना त्यातील सभागृहात नाटक, चित्रपट, वाद्यवृंद, जादूचे प्रयोग, व्याख्यान अशा अनेक गोष्टींचा समावेश असावा आणि जोडीला वाचनालय, कला दालन असावे असलेली अपेक्षा स्वागतार्ह...!

# उष्माघातापासून असा करा बचाव!

सध्या उष्णतेचा पारा चढता आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार मार्च ते मे २०२५ या कालावधीत संभाव्य उष्णतेची लाट येण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्या अनुषंगाने उष्णतेच्या लाटेपासून बचाव करण्यासाठी नागरिकांनी काय करावे व काय करू नये याबाबतच्या मार्गदर्शक सूचना जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत जारी करण्यात आल्या आहेत. याबाबत जाणून घेऊया...

उष्णतेच्या लाटेमुळे शारीरिक ताण निर्माण होऊन मृत्यू होण्याची शक्यता आहे. उष्णतेच्या लाटेदरम्यान परिणाम कमी करण्यासाठी आणि उष्मघातामुळे होणारे परिणाम टाळण्यासाठी खालील उपाय करू शकता.

उष्णतेच्या लाटेची माहिती देण्याकरिता रेडिओ, टि.व्ही., सोशल मिडीया व स्थानिक वृत्तपत्रे प्रसारमाध्यमांचा वापर करावा.

जिल्हा नियंत्रण कक्ष/महानगरपालिका नियंत्रण कक्ष/ विभागीय स्तरावरील नियंत्रण कक्ष व स्थानिक संस्था आणि आरोग्य विभाग यांनी एकत्रित कार्य करावे.

सर्व संबंधित विभाग, स्थानिक पुढारी व सामाजिक संस्था यांनी या कार्यात सामील व्हावे.





**उष्माघातापासून बचाव करण्यासाठी काय करावे**

तहान लागलेली नसली तरीही अधिकाधिक पाणी प्यावे. हलकी, पातळ व सच्छिद्र सुती कपडे वापरावेत. बाहेर जाताना गॉगल्स, छत्रो/टोपी, बुट व चपलांचा वापर करावा. प्रवास करताना पाण्याची बाटली सोबत ठेवावी.

उन्हात काम करीत असलेल्या व्यक्तींनी डोक्यावर टोपी किंवा छत्रीचा वापर करावा तसेच ओल्या कपड्यांनी डोके, मान व चेहरा झाकावा.

शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होत असल्यास ओआरएस, घरी बनविण्यात आलेली लस्सी, तोरणी, लिंबू पाणी, ताक इत्यादीचा नियमित वापर करावा.

अशक्तपणा, स्थूलपणा, डोकेदुखी, सतत येणारा घाम इत्यादी उन्हाचा झटका बसण्याची चिन्हे ओळखावीत व चक्कर येत असल्यास तत्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

गुरांना छावणीत ठेवावे तसेच त्यांना पुरेसे पिण्याचे पाणी द्यावे.

घरे थंड ठेवण्यासाठी पडदे, शटर व सनशेडचा वापर करावा. रात्री खिडक्या उघड्या ठेवाव्यात.

पंखे, ओले कपडे यांचा वापर करावा तसेच थंड पाण्याने वेळोवेळी स्नान करावे.

कामाच्या ठिकाणी जवळच थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी.

सूर्यप्रकाशाचा थेट संबंध टाळण्यासाठी कामगारांना सुचित करावे.

पहाटेच्या वेळी जास्तीत जास्त कामाचा निपटारा करावा.

बाहेर कामकाज करीत असताना अधूनमधून विश्रांती घेऊन नियमित आराम करावा.

गरोदर कामगार व आजारी कामगारांची अधिकची काळजी घ्यावी.

रस्ताच्या कडेला उन्हापासून संरक्षणाकरिता शेड उभारावेत व जागोजागी पाणपोईची सुविधा करावी.


**उष्माघातापासून बचाव करण्यासाठी काय करू नये**

लहान मुले किंवा पाळीव प्राण्यांना बंद असलेल्या व पार्क केलेल्या वाहनात ठेवू नये. दुपारी १२ ते ३.३० या कालावधीत उन्हात बाहेर जाणे टाळावे. गडद, घट्ट व जाड कपडे घालण्याचे टाळावे. बाहेर तापमान अधिक असल्यास शारिरीक श्रमाची कामे टाळावीत. दुपारी १२ ते ३.३० या कालावधीत बाहेर काम करणे टाळावे. उन्हाच्या कालावधीत स्वयंपाक करण्याचे टाळावे. तसेच मोकळ्या हवेसाठी स्वयंपाकघराची दारे व खिडक्या उघड्या ठेवाव्यात.

**–मनोज सानप,**
**जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे**

# अष्टपैलू व्यक्तिमत्व वि.स. पागे

ग्रामीण भागातील रोजगार निर्मिती या क्षेत्रात देशातील इतर राज्यांना आदर्श ठरलेल्या महाराष्ट्राच्या रोजगार हमी योजनेचे जनक आणि महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापतीपद अठरा वर्षे सांभाळणारे ज्येष्ठ नेते, स्वातंत्र्यसैनिक, तत्त्वचिंतक विठ्ठल सखाराम तथा वि.स. पागे यांची आज जयंती. त्यांच्या अभ्यासू व्यक्तिमत्त्वाला अनेक पैलू होते.



वि.स. पागे यांचा जन्म २१ जुलै १९१० रोजी झाला. वकील, समाजसेवक, राजकारणी, लोकप्रतिनिधी, चिंतक, अर्थव्यवस्थेचे अभ्यासक आणि विश्लेषण करून उपाय सुचविणारे प्रशासक अशी त्यांची अनेक रूपे होती. त्याशिवाय संत वाङ्मयाचा आणि संस्कृतचा गाढा अभ्यास हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वेगळेच वैशिष्ट्य होते. अठरा वर्षे विधान परिषदेचे सभापतीपद सांभाळणे आणि तेही कोणत्याही अपवादाचा किंवा प्रवादाचा विषय न होता सांभाळणे ही कामगिरी फार थोड्या लोकांना जमू शकते. विशेषत: पागे यांच्या कारकिर्दीत अनेक मातब्बर नेते सभागृहाचे सदस्य होते.

अशा वेळी पागे अतिशय शांतपणे, कायदे आणि नियमांचा अर्थ लावून सुस्पष्ट निर्णय देत, की तो आपोआपच सर्वांना मान्य ठरत असे. परंतु त्यांच्या विधीमंडळातील कारकीर्दीपेक्षाही त्यांची आठवण महाराष्ट्राला व देशाला राहील ती रोजगार हमी योजनेचे जनक म्हणूनच. अकुशल ग्रामीण बेरोजगारांना स्वत:च्या परिसरामध्ये रोजगार प्राप्त करून देणारी ही योजना कोट्यवधी बेरोजगारांना अक्षरश: वरदानच ठरली. या योजनेमुळे शहरांकडे जाणाऱ्या लोंढ्यांच्या स्थलांतराचे प्रमाण नि:संशयपणे कमी झाले आहे.

अध्यात्म, संतवाङ्मय आणि संसदीय परंपरा हे त्यांचे जिव्हाळ्याचे विषय होते. त्यावर बोलताना वि. स. पागे रंगून जात असत. त्यांच्या निवेदनात रसाळपण तर असेच; पण या विषयांचा गाढ अभ्यासही जाणवत असे. संस्कृत भाषेचा त्यांचा व्यासंगही दांडगा होता. त्याचे प्रत्यंतर त्यांच्या भाषणांमधून सतत जाणवत असे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाप्रमाणे त्यांच्या भाषेलाही संस्कृतच्या सहवासामुळे एक अभिजात भारदस्तपणा प्राप्त झालेला होता.

वि.स. पागे हे उत्तम दर्जाचे कवी, नाटककार होते. १९३२–३३च्या सुमारास त्यांनी 'वीर मोहन' नावाचे नाटक लिहिले होते. 'निवडणुकीचा नारळ' नावाची नाटिका लिहिली होती. त्याचप्रमाणे 'पहाटेची नौबत' आणि 'अमरपक्षी' या नावाचे त्यांचे दोन काव्यसंग्रह प्रसिद्ध झाले आहेत.

'तुका म्हणे जाऊ वैकुंठा चालत' हे त्यांनी लिहिलेले सुंदर संगीत नाटक, ज्येष्ठ अभिनेते दिग्दर्शक दाजी भाटवडेकर हे या नाटकाचे दिग्दर्शक होते तसेच संत तुकारामांची प्रमुख भूमिकाही त्यांनीच साकारली होती. सामान्यातून साधुत्वापर्यंतचा संत तुकारामांचा प्रवास त्या नाटकामध्ये सादर केला आहे. १६ मार्च १९९० रोजी वि.स. पागे यांचे निधन झाले.

(साभार : इंटरनेट)

# माथेरानच्या बदनामीमुळे पर्यटन व्यवसायावर विपरीत परिणाम

## पर्यटकांच्या फसवणुकीमुळे स्थानिकांचा संताप; उद्या बैठक

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरानमध्ये येणाऱ्या पर्यटकांच्या फसवणूकीचे तसेच लुटीचे प्रकार समोर येत आहेत. त्यामुळे माथेरानची बदनामी होत आहे. या बदनामीचा माथेरानच्या पर्यटन व्यवसायावर विपरीत परिणाम होत आहे. त्यामुळे सोमवारी (दि. १७) या महत्त्वाच्या विषयावर अंतिम बैठक या ठिकाणी प्रशासनाच्या पातळीवर होणार आहे. यामध्ये सकारात्मक निर्णयाची अपेक्षा असून ही पर्यटकांची होणारी लूट तातडीने थांबवा अन्यथा १८ मार्चपासून माथेरान बंद करू, असा इशारा स्थानिक माथेरानकरांनी दिला आहे.

ब्रिटीश काळापासून माथेरान हे थंड हवेचे ठिकाण आणि आदर्श पर्यटनस्थळ म्हणून नावारूपास आले आहे. दरवर्षी लाखो पर्यटक माथेरानला भेट देऊन येथील निसर्गाचा मनमुराद आनंद लुटत असतात, मात्र गेल्या काही महिन्यांपासून माथेरानमध्ये येणाऱ्या पर्यटकांची फसवणूक होण्याचे त्यांना लूटण्याचे प्रकार समोर येऊ लागले आहेत. समाज माध्यमांवर येणाऱ्या पर्यटकांकडून याबाबचे अनुभव प्रसारित केले जात आहेत. त्यामुळे माथेरानच्या पर्यटनाला ओहोटी लागण्यास सुरूवात झाली आहे. या संदर्भात स्थानिक प्रशासनाने हस्तक्षेप करून पाऊले उचलावीत, अशी मागणी माथेरान पर्यटन बचाव संघर्ष समितीने केली आहे. माथेरान दस्तुरी नाका येथे येणाऱ्या पर्यटकांना अश्वचालक, कुली आणि रूम एजंट गराडा घालतात. पर्यटकांना खोटी माहिती देऊन त्यांची दिशाभूल केली जाते. पर्यटकांना चुकीची माहिती देऊन फसवणूक करणे, अवाजवी दर आकारणी करणे असे प्रकार येथे वारंवार घडत आहेत.पार्कींग मध्ये उभ्या असणाऱ्या वाहनांची हवा काढणे, वाहनांवर रेघोट्या ओढणे असे प्रकारसुद्धा येथे सुरू झाले आहेत.




यासर्व प्रकारांमुळे माथेरानची बदनामी होत असून माथेरानच्या पर्यटनावर त्याचे विपरित परिणाम होण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे स्थानिक प्रशासन आणि पोलीस यांनी यात हस्तक्षेप करून अशा अनुचित प्रकारांना प्रतिबंध करावा अशी मागणी माथेरान पर्यटन बचाव संघर्ष समितीने केली आहे. दस्तुरी नाका म्हणजेच टॅक्सी स्टँड येथे पोलीस बंदोबस्तात वाढ करावी,तिथे पर्यटन सुविधा केंद्र सुरू करावे, पार्कंग झोन मध्ये घोडेवाले, रूम एजंट, कुली यांना प्रवेशबंदी करण्यात यावी, सिसीटीव्ही कॅमेरे तातडीने सुरु करण्यात यावेत तसेच अश्वचालक, कुली, रिक्षाचालक यांचे दरपत्रक दर्शनी भागात लावण्यात यावेत, अशी मागणी समितीने माथेरानच्या अधीक्षकांकडे केली आहे.

यावर तातडीने पावले उचलली गेली नाहीत तर मग १८ मार्चपासून माथेरान बंद करण्याचा इशाराही दिला आहे. माथेरानला येणाऱ्या पर्यटकांकडून अश्वचालक आणि टॅक्सीचालक यांच्याकडून मनमानी पध्दतीने पैशाची आकारणी करत आहेत. अवाजवी भाडे नाकारणाऱ्या पर्यटकांना त्रास दिला जात आहे. फसवणूकीच्या अशा प्रकारांमुळे माथेरानचे पर्यटन धोक्यात येत असून हे प्रकार तातडीने थांबले पाहिजेत. या महत्वाच्या विषयी आता अंतिम बैठक १७ मार्च रोजी प्रशासनाच्या पातळीवर घेतली जाणार आहे. यामध्ये सकारात्मक निर्णयाची अपेक्षा स्थानिकांकडून केली जात आहे.

# ग्राहक हक्क दिनानिमित्त पथनाट्याद्वारे जनजागृती

**कर्जत : प्रतिनिधी**

जागतिक ग्राहक हक्क दिनाचे औचित्य साधून तहसीलदार कार्यालय कर्जत यांच्या वतीने उपविभागीय अधिकारी कर्जत प्रकाश संकपाळ व तहसीलदार कर्जत धनंजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली ग्राहकांच्या जनजागृतीसाठी महिला मंडळ संचलित विद्या विकास मंदिर शाळेतील विद्यार्थ्यांच्या सहभागाने पथ फेरी व पथनाट्यद्वारे जागतिक ग्राहक हक्क दिन झाला.

ग्राहकांना अनेकदा काळाबाजार, मोजमापातील त्रुटी, मनमानी किमती आकारणे, साठेबाजी, भेसळ, दर्जाहीन वस्तूची विक्री, फसवणूक, वस्तूची विक्री नंतर हमी किंवा आम्ही देऊनी सेवा न देणे अशा समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यामुळे या समस्या पासून सुटका व्हावी आणि त्यांना त्यांच्या हक्काची जाणीव व्हावी म्हणून हा आजचा १५ मार्च ग्राहक हक्क दिन म्हणून साजरा करण्यात येत आहे. महिला मंडळ संचलित विद्या विकास मंदिर शाळेमध्ये जागतिक ग्राहक हक्क दिनाचे औचित्य साधून पथनाट्याचे आयोजन करण्यात आले होते.

मंडल अधिकारी संतोष जांभळे यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रस्ताविकात, 'सुरक्षितेचा अधिकार, माहितीचा अधिकार, निवडण्याचा अधिकार, ऐकण्याचा अधिकार, निवारण मिळवण्याचा अधिकार, ग्राहक शिक्षणाचा अधिकार, मूलभूत गरजा पूर्ण करण्याचा अधिकार, निरोगी वातावरणाचा अधिकार असे अनेक अधिकार या ग्राहक चळवळीमुळे देशातील सर्व ग्राहकांना मिळाले या मिळालेल्या अधिकाराची जोपासना करण्यासाठी व ग्राहकांच्या हक्काची पायमल्ली होणार नाही यासाठी सर्व ग्राहकांनी दक्ष राहणे गरजेचे आहे.' असे स्पष्ट केले.

या वेळी पुरवठा निरीक्षण अधिकारी रवींद्र दळवी, मंडळ अधिकारी संतोष जांभळे, पुरवठा निरीक्षक मयुरी बागुल, पुरवठा लिपीक राजेश गायकवाड, प्रेमा पितळे, आरती कोकरे, सारिका देशमुख आदींसह शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.



# माथेरान पर्यटनस्थळी धुलिवंदन उत्साहात

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरानमध्ये होळी आणि धूलिवंदनाची धूम पाहावयास मिळाली. विकेंडला जोडून आलेल्या धूलिवंदनामुळे पर्यटक माथेरानमध्ये दाखल झाले होते. येथील काही हॉटेल्समध्ये रेन डान्सचे आयोजन करण्यात आले होते. निसर्गाच्या सान्निध्यात रंग उधळताना पर्यटक मंत्रमुग्ध होताना दिसले. माथेरान पर्यटनस्थळी पर्यटकांनी धुलीवंदनाची मजा घेतली.




शुक्रवारी धूलिवंदनाच्या दिवशी रेन डान्समध्ये पर्यावरणपूरक रंग आणि अंगावर पडणारा कृत्रिम पाऊस, त्यातच गाण्यांच्या तालावर थिरकताना पर्यटकांना एक वेगळी मजा अनुभवता आली. सकाळी ८ वाजल्यापासून सायं.६ वाजेपर्यंत पर्यटक रंगात न्हाऊन निघाले. उकाड्याने हैराण झालेल्या पर्यटकांना येथील नैसर्गिक वातावरणाने सुखद आनंद दिला. येणाऱ्या पर्यटकांना भुरळ घालण्यासाठी हॉटेल असोसिएशनकडून अनेक क्लृत्या वापरल्या गेल्या. त्यापैकी रेन डान्स ही संकल्पना माथेरानमध्ये रूढ झाली आहे. हा रंगांचा सण आणि रेन डान्स यांची सांगड घालून गाण्यांच्या तालावर पर्यटकांना आनंद देण्यासाठी दोन दिवस अगोदरपासूनच हॉटेल्समध्ये तयारी करण्यात आली.

पर्यटकांना अपेक्षित सुविधा मिळाल्यामुळे ते सुखावून गेले. फक्त हॉटेलमध्ये राहिलेले पर्यटकच नव्हे तर बाहेरील पर्यटकसुद्धा रंगोत्सवात सामील झालेले दिसत होते. काही विदेशी पर्यटकांनीसुद्धा स्थानिकांसोबत धुलीवंदनाचा आनंद घेतला.

# एस.पी. जाधव यांची पुरस्कारासाठी निवड

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील ग्रूप ग्राम पंचायत चौकचे ग्रामपंचायत अधिकारी एस.पी. जाधव यांची नालंदा ऑर्गनायझेशन राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड झाली असून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

ग्राम पंचायत अधिकारी एस.पी. जाधव हे कायद्याच्या चाकोरीतून मार्ग काढणारे आणि सर्वांशी संपर्क साधून विकास कार्यासाठी आवश्यक जनजागृती करणारे म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. इरसाल वाडी या दुर्घटनेत त्यांनी केलेले अतुलनीय कौशल्य पाहून तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रशासनातील गतिमान आणि कार्यकुशल अधिकारी म्हणून त्यांचा उल्लेख करून सन्मान पत्र दिले आहे.



सद्या माझी वसुंधरा अभियान ५.० यात झोकून दिले आहे, माझी वसुंधरा अभियान यशस्वी करण्यासाठी वेगवेगळ्या पद्धतीने ते काम करीत आहेत.

नुकताच त्यांच्या चढत्या कार्याचा आढावा घेऊन नालंदा ऑर्गनायझेशन यांनी आदर्श ग्राम पंचायत अधिकारी म्हणून त्यांना महाराष्ट्र समाजरत्न पुरस्कार २०२५ ची घोषणा केली आहे.

# डॉ. तझिन रहाटवीलकर यांना पुरस्कार

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावमधील प्रसिद्ध अल्फा हॉस्पिटलचे डॉ. इस्माईल रहाटवीलकर यांच्या पत्नी डॉ. तझिन रहाटवीलकर यांना स्टेट बँक ऑफ इंडिया माणगाव शाखेतर्फे आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त कर्तृत्वान महिला पुरस्काराने गुरुवारी (दि.१३) त्यांच्या माणगाव येथील निवासस्थानी बँकेचे प्रादेशिक व्यवस्थापक तथा बँकेच्या जीवन विमा मुंबई मेट्रोचे अधिकारी राघवेंद्रकुमार सिंन्हा यांच्या सहीचे प्रमाणपत्र व आकर्षक सन्मानचिन्ह व देऊन बँकेचे शाखाधिकारी जितेंद्र रामगुडे यांच्याहस्ते सन्मानित करण्यात आले.



हा पुरस्कार डॉ.तझिन रहाटवीलकर व डॉ. इस्माईल रहाटवीलकर यांनी एकत्रित स्वीकारला. डॉ.तझिन रहाटवीलकर यांना सदरचा पुरस्कार मिळाल्याने त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे. डॉ.तझिन रहाटवीलकर कॉसपोटो लॉजिस्ट त्वचा रोग तज्ञ डॉक्टर म्हणून सर्वत्र परिचित आहेत. माणगाव मोर्बारोड मार्गावरील खांदाड गावच्या हद्दीत डॉ.इस्माईल रहाटवीलकर व डॉ. तझिन रहाटवीलकर यांचा अल्फा हॉस्पिटल नावाने मोठे रुग्णालय आहे. या रुग्णालयात त्वचा रोग तज्ञ डॉक्टर म्हणून डॉ. तझिन रहाटवीलकर या रुग्णांना चांगल्या प्रकारे सेवा देत असतात. आपल्या वैद्यकीय व्यवसायाबरोबरच सामाजिक कार्यातही डॉ. तझिन आपले पती डॉ.इस्माईल रहाटवीलकर यांच्या समवेत काम करीत असतात.

डॉ.तझिन यांची सामाजिक बांधिलकी विचारात घेत स्टेट बँक ऑफ इंडिया माणगाव शाखेने आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त त्यांना कर्तृत्वान महिला पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



**माणगाव : येथे बच्चेकंपनीने धुळवड उत्साहात साजरी केली.**

# रोहा येथे गुड टच, बॅड टच कार्यक्रम

**रोहे : प्रतिनिधी**

मंत्री आदिती तटकरे यांच्या वाढदिवसाच्या वाढदिवसानिमित्ताने बुधवारी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष रोहा शहर तर्फे सी.डी.देशमुख कन्याशाळा रोहा येथे गुड टच बॅड टच या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



गुड टच बॅड टच या आदी आत्मरक्षा कार्यक्रमांतर्गत मुलींना चांगला स्पर्श आणि वाईट स्पर्श यातील फरक शिकवणे, गैरवर्तनाचा प्रतिकार करत आत्मरक्षा करण्याचा अधिकार आहे हे जाणून घेण्यात मदत करणे असे विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाला डॉ. सलमा मुजावर व सुमेधा आठवले यांनीदेखील मार्गदर्शन केले.

कार्यकमाला योग प्रशिक्षक विभा चोरगे, रोहा नगरपरिषदेचे माजी गटनेते महेंद्र गुजर, शहराध्यक्ष अमित उकडे, माजी नगरसेवक महेश कोल्हटकर, मयुर दिवेकर, चंद्रकांत पार्टे, स्वप्नील धनावडे, निलेश शिर्के, जितू साळुंखे, माझ सवाल, विनीत वाकडे व मुख्याध्यपिका धन्वी मॅडम आदी उपस्थित होते. आसावरी मोकल यांनी आभार मानले.


## जाहीर प्रसिध्दीकरण

पुढे नमुद केलेल्या सहकारी संस्थेचे सन २०२५ ते २०३० या कालावधीतील पंचवार्षिक निवडणूकीसाठी निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करण्यांत येत आहे. संस्थेचे, एकविरा नागरी सहकारी पतसंस्था मर्या. खांदा कॉलनी, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड., असे असून सदर कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्र स्विकृती दि. १७/०३/२०२५ ते २१/०३/२०२५, नामनिर्देशन पत्र छाननी दि. २४/०३/२०२५, नामनिर्देशन पत्र माघारी दि.२६/०३/२०२५ ते ११/०४/२०२५व आवश्यकतेनुसार मतदान अनुक्रमे दिनांक २७/०४/२०२५ रोजी घेण्यांत येईल तपशिलवार निवडणूक कार्यक्रम, निवडणूकीबाबत सूचना व अधिक माहीती तालुका सहकारी निवडणूक अधिकारी कार्यालयामध्ये पहावयास मिळेल तरी संस्थेच्या सभासदांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
(मोहन ढेरंगे)
निवडणूक निर्णय अधिकारी


# श्रीवर्धन तालुक्यात पारंपरिक पद्धतीने होळी

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यातील होळी उत्सव दरवर्षी पारंपरिक पद्धतीने आणि अनोख्या उत्साहात साजरा केला जातो. फाल्गुन महिन्यात सुरू होणारा हा सण स्थानिक लोकांच्या एकतेचा, भक्तिरसाचा आणि रंगांचा प्रतीक असतो. विशेषत: कोळीवाड्यांमध्ये होळीला अत्यंत महत्त्व दिले जाते आणि त्या ठिकाणी हा उत्सव एक आनंदी आणि रंगीबेरंगी वातावरणात साजरा केला जातो.



श्रीवर्धन शहरात होळीच्या प्रारंभात सर्वप्रथम भैरवनाथ पाखाडी येथे माणाची होळी उभी केली जाते. होळीच्या उभारणीसाठी विशेष तयारी केली जाते. त्यानंतर, शहराच्या इतर भागांमध्ये होळ्या उभ्या केल्या जातात. मच्छीमारी कोळीवाड्यात होळीच्या देवीचे गाणे गात आणि उत्साहाची लाट निर्माण केली जाते. विशेषत: श्री काळभैरवनाथ मंदिराजवळ आणि भुषण माता व सोमजाई देवीच्या पटांगणातील होळ्या महत्त्वपूर्ण ठरतात. या ठिकाणी होळी पूजनासाठी लोक मोठ्या संख्येने एकत्र येतात आणि गोड गोड गाणी गात एकत्रितपणे उत्सव साजरा करतात.

श्रीवर्धन तालुक्यातील कोळी बांधव आपल्या होळीला विशेष मान देतात, कारण त्यावर त्यांचा जीविका आणि उदरनिर्वाह अवलंबून असतो. या होडीला ढोल ताऱ्याच्या गजरात मान दिला जातो, ज्यामुळे या उत्सवाची महत्त्वपूर्णता आणखी वाढते. लोक आपल्या पारंपरिक कार्यात आनंद आणि एकतेचा अनुभव घेत, देवतेचा आशीर्वाद घेत होळीला रंगवतात.

श्रीवर्धन तालुक्यातील होळी उत्सव स्थानिकांची एकजुटीचा, भक्तिरसाचा आणि रंगांचा उत्सव म्हणून ओळखला जातो.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे-वाजे, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड.**

| भूमापन नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| ११२ | ०-४०-००<br>वरकस ०-४७-३०<br>पो.ख. ०-०८-३०<br>एकूण ०-९५-६०<br>**पैकी ०-२५-००** | ५.३७ | **श्री. विनायक गुरुनाथ जगे** |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. १५/०३/२०२५**

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल.
मो.क्र. : ९९३०३६९८६१



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत खाली नमूद केलेल्या इसमांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे व तसे खरेदीखत ही त्यांचेबरोबर केलेला आहे.

तरी सदरहू मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, खरेदीखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसाच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषेद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे तुर्भे, ता. पनवेल, जि. रायगड,**

| सर्व्हे नंबर /गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| ५४ | २ | ० – २० – ००<br>पो.ख. ० – ०० – ००<br>एकूण ० – २० – ०० | १.७५ | १) श्री. जगदीश मारूती भोईर,<br>२) वैशाली दिलीप भोईर |

**पनवेल.**
**दिनांक : १५/०३/२०२५.**

**सही/-**
**ॲड. जयवंत एकनाथ भोपी**
**ॲडव्होकेट**
शॉप नं. १३, वरद विनायक कॉम्प्लेक्स, प्लॉट नंबर ३, सेक्टर नंबर ५, गुरूद्वारा समोर, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.

## निवडक

### ऐरोलीतील अतिक्रमण हटविले

**नवी मुंबई :** महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या



वतीने ऐरोली विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली. नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जी विभाग ऐरोली अंतर्गत सी २१७, से ०२, ऐरोली व सी २६६, से ०२, ऐरोली तसेच बी ४५७, से ०२, ऐरोली येथील बांधकाम नवी मुंबई महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता अनधिकृतपणे केलेले होते. त्यांनी अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविले नसल्याने हेअनधिकृत बांधकाम अतिक्रमण मोहिम राबवून सदर बांधकाम अंशत: निष्कासित करण्यात आले आहे.

### महिलांना औषधांचे वाटप



**उरण :** उरण मेडीकल वेल्फेअर असोसिएशन व आयुर्वेद व्यासपीठ उरण शाखेतर्फे आंतराष्ट्रीय महिला दिनानिमित्त डाउरनगर उरण येथील आंगणवाडीमध्ये महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर व औषधे वाटप हा कार्यक्रम घेण्यात आला. याचा लाभ ९०हून अधिक महिलांनी घेतला. यासाठी डॉ. हेमलता वैशंपायन, डॉ.दया परदेशी, डॉ.प्राजक्ता कोळी, डॉ.सविता ढेरे यांनी रूग्ण तपासणी करून औषधे दिली. या उपक्रमाचे उत्तम असे व्यवस्थापन श्लोक पाटील (माई फांउडेशन, कलश फांउडेशन) व कल्पना सुर्वे (स्व.तृप्ती सुधीर सुर्वे फांउडेशन) यांनी केले.

# नवी मुंबईत शाश्वत पर्यावरणावर भर

## माझी वसुंधरा अभियानांतर्गत पालिकेत विशेष परिसंवाद

**नवी मुंबई : बातमीदार**

मागील काही वर्षात वातावरणात झपाट्याने होणारे बदल बघता सर्वांनीच सतर्क होण्याची गरज असून प्रत्येक घटकाने आपापल्या परीने पर्यावरण संरक्षण व संवर्धन करण्याकरिता आपला वाटा उचलला पाहिजे, असे मत व्यक्त करीत नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी पर्यावरणशील जीवनासाठी मिशन म्हणून काम केले पाहिजे असे सांगितले.

नवी मुंबई महानगरपालिका आणि आगाखान एजन्सी फॉर हॅबिटॅट इंडिया यांच्या वतीने माझी वसुंधरा अभियान अंतर्गत आयोजित 'संवेदनक्षम नवी मुंबई' या मुख्यालयातील ज्ञानकेंद्रात संपन्न झालेल्या परिसंवादाच्या निमित्त आयुक्तांनी शाश्वत पर्यावरणाचे महत्त्व सांगितले.



या वेळी आयुक्तांसमवेत राज्य हवामान कृती कक्षाचे संचालक अभिजित घोरपडे, अतिरिक्त आयुक्त सुनील पवार, नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे सहआयुक्त समीर उन्हाळे, महानगरपालिकेचे शहर अभियंता शिरीष आरदवाड, आगाखान एजन्सी फॉर हॅबिटॅट इंडिया संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रेरणा लांगा आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

आपत्ती निवारणात पर्यावरणशील प्रणालीचे शाश्वत व्यवस्थापन या विषयाच्या अनुषंगाने भाष्य करताना आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी सध्या वातावरणातील उष्मा प्रचंड वाढला असल्याचे सांगत आता पावसाचे प्रमाणही वाढले असून पाऊस पडण्याचा कालावधी मात्र कमी झाला असल्याचे सांगितले. त्यामुळे एका दिवशी मोठ्या प्रमाणात पडणारा पाऊस व नंतर अनेक दिवस न पडणारा पाऊस अशा व्यस्त प्रमाणामुळे अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असून त्या दृष्टीने यापुढील काळात नियोजनाकडे अधिक बारकाईने लक्ष दयावे लागेल असे ते म्हणाले.

पावसाळी कालावधीत शहरात पाणी साचण्यापासून होल्डिंग पाँडमुळे संरक्षण मिळते, तथापि मागील पावसाळ्यात सानपाडा भागात पाणी साचल्यानंतर आयआयटी तज्ज्ञांमार्फत पाहणी केली असता होल्डिंग पाँडची क्षमता कमी झाल्याने ही परिस्थिती उद्भवल्याचे लक्षात आले. याबाबत महानगरपालिका ठोस प्रयत्न करीत असल्याची माहिती त्यांनी दिली.

पर्यावरणविषयक काम करणाऱ्या संस्थांना व व्यक्तींना एकत्र आणून यावर ठोस विचारविनिमय व्हावा यादृष्टीने आजचा परिसंवाद आयोजित करण्यात आला असून या ठिकाणी उपस्थित असलेल्या पर्यावरण विषयक जागरुक नागरिकांच्या माध्यमातून हा विचार असंख्य नागरिकांपर्यंत पोहचेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

परिसंवादाच्या व्दितीय सत्रातील वक्ते म्हणून बोलताना राज्य हवामान कृती कक्षाचे संचालक अभिजित घोरपडे यांनी राज्य शासनामार्फत पर्यावरणविषयक केल्या जाणाऱ्या कामांची सविस्तर माहिती दिली. तसेच शासकीय योजना व उपक्रम आणि वातावरणातील बदलांचा सामना करण्यासाठीचा कृती आराखडा याविषयीही त्यांनी विस्ताराने सांगितले. मान्सूनचे बदलते चक्र व त्यामुळे शेतीवर आणि जीवनमानावर होणारा परिणाम लक्षात घेऊन नवीन क्रॉपींग कॅलेंडर शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्याची गरज त्यांनी सांगितली.

अतिरिक्त् आयुक्त सुनील पवार यांनी पृथ्वी, अग्नि, जल, वायू, आकाश या पंचतत्वांनी सारे जग व्यापलेले असून त्यातल्या एका जरी तत्वाला धक्का पोहोचला किंवा अडथळा आला तर आपल्याला आपत्तीला सामोरे जावे लागते. त्यामुळे निसर्गाच्या या पंचतत्वांचे रक्षण व संवर्धन करणे हे आपले कर्तव्य असून चांगले आहे ते टिकवणे व कमी आहे त्यावर काम करणे हे आपले ध्येय असले पाहिजे असे ते म्हणाले.

नगर परिषद प्रशासन संचालनालयाचे सहआयुक्त समीर उन्हाळे यांनी विविध कायद्यांची माहिती देत सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पर्यावरण जागरुकता निर्माण करण्याची गरज विशद केली. वातावरणातील बदल फार झपाट्याने होत आहेत त्यामुळे प्रतिसादही गतीमान हवा असे त्यांनी सांगितले.

परिसंवादाच्या पहिल्या सत्रात आयआयटी मुंबईच्या सहाय्यक प्रा. डॉ.मालिनी कष्णन कुट्टी, वास्तुविशारद व भूस्थानिक विश्लेषक अभिजित एकबोटे, एनव्हायर्नमेंट लाईफ फाऊन्डेशनचे संस्थापक धर्मेश बराई यांनी 'शहरी जोखीम आणि संवेदनक्षमता निर्माण करण्यात परिसंस्थांची भूमिका' मांडली. टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सचे सहा.प्राध्यापक महेश कांबळे यांनी या सत्राचे समन्वयक म्हणून भूमिका पार पाडली. या परिसंवादात पाणथळ जागांचे महत्व, प्रशासनाप्रमाणेच नागरिकांचीही पर्यावरण रक्षण – संवर्धनात जबाबदारी, पर्यावरणशील प्रणालीच्या शाश्वत व्यवस्थापन नियोजनातील अडचणी व त्यावरील उपाययोजना अशा विविध विषयांवर विचारविनिमय करण्यात आला.

या परिसंवादामध्ये पर्यावरण क्षेत्रातील तज्ज्ञांप्रमाणेच टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स व इतर स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी तसेच एनएसएसचे विद्यार्थी आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पर्यावरणासारख्या महत्वाच्या विषयावर नागरिकांना सहभागी करून घेत नवी मुंबई महानगरपालिकेने माझी वसुंधरा अभियानांतर्गत एक महत्वाचा उपक्रम हाती घेतल्याबद्दल व तोही मराठी भाषेत आयोजित केल्याबद्दल राज्य हवामान कृती कक्षाचे संचालक अभिजित घोरपडे यांनी विशेष प्रशंसा केली.

# नवी मुंबईत होलिकोत्सव



**संस्कृतीची जपणूक**

आज नवी मुंबईसारख्या वेगाने बदलणाऱ्या शहरातदेखील कोळी बांधवांनी आपली संस्कृती टिकवली आहे. बेलापूर येथील दिवाळे, सारसोळे, नेरुळ, घणसोली, दिवा, कोळीवाडा येथील कोळी बांधवानी होळी उत्सव अगदी पारंपरिक पद्धतीने साजरा केला. होळीच्या दिवशी मध्यरात्री होळीला अग्नी लावण्यात आली. पारंपरिक अग्नी दिल्यानंतर कोळी बांधवानी विविध कोळी नृत्य करत होळी भोवती फेर धरला होता. यामुळे खऱ्या अर्थाने कोळीबांधवांच्या आनंदाला उधाण आल्याचे पाहायला मिळाले.

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबईतील शहरी आणि ग्रामीण भागात होळी आणि रंगपंचमी मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. विशेषतः येथील कोळी वाड्यात पारंपरिक हॉलिकोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.

नवी मुंबईतील स्थानिक आगरी–कोळी समाजाने एक गाव, एक होळी ही प्रथा जपत हा सण मोठ्या उत्साहाने साजरा केला. प्रत्येक गावात एकाच गावकीच्या मानाच्या होळीची विधिवत व पारंपरिक पद्धतीने पूजा केली गेली. गावातील महिलानी पारंपरिक वेषात होळीभोवती फेर धरत गाणी गायली. अशा पद्धतीने नवी मुंबईतील गावांमध्ये होळी उत्साहात साजरी करण्यात आली.

होळीच्या दहा दिवस आधी पासूनच प्रत्येक गावागावात शिमगा साजरा करण्याची प्रथा आजही नव्या पिढी कडून जोपसली जात आहे. त्यात प्रत्येक गावागावात होळी सणा च्या एक दिवस आधी सोग घेण्याची प्रथा आहे. त्यानुसार विविध प्रकारचे सोग घेऊन वाजत गाजत गावातून मिरवणूक काढण्यात आली होती. तसेच होळी च्या दिवशी प्रत्येक गावात महिला, पुरुष तसेच तरुण तरुणाई होळी भोंवती फेर धरून पारंपरिक गाणी गाऊन शिमगा साजरा केला.

भक्तिभावनेने होळीमातेचे केलेले विधिवत पूजन. कापराच्या साह्याने होम पेटवल्यानंतर हातातील डमरू व डफ वाजवत 'होळी रे होळी, पुरणाची पोळी', असे ओरडत तिच्याभोवती नाचणाऱ्या बालगोपाळांनी चौकाचौकांत भव्य होळी पेटवल्या तर दुसऱ्या दिवशी रंगाची उधळण करत रंगपंचमी साजरी केली.

गावागावात होळी च्या दिवशी पारंपरिक पद्धतीने सोग घेत गावातून वधू वरांची बँडच्या तालावर वरात काढण्यात आली. तसेच विविध सोंग घेत होळी सणाची मजा लुटली. या वेळी विविध प्रकारचे पोशाख परिधान करत सोंग घेतले होते.

# आंतरशालेय सांस्कृतिक चषक स्पर्धेत मॉडर्न स्कूल प्रथम

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई महापालिकेच्या वतीने राबविण्यात आलेल्या आंतरशालेय सांस्कृतिक चषकांतर्गत गायन स्पर्धेत सहावी ते दहावी या मोठ्या गटात रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील मॉडर्न स्कूलच्या विद्यार्थांनी प्रथम क्रमांक पटकाविला आहे.

सुनियोजित अशा आधुनिक शहराप्रमाणेच सांस्कृतिक शहर ही नवी मुंबईची ओळख दृढ करण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येत असून नव्या पिढीमध्ये कला व संस्कृती जोपासना करण्यासाठी शालेय पातळीवर विविध कला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये गायन, नृत्य, लघुनाटिका, पथनाट्य अशा विविध स्पर्धांचा




समावेश होता. गायन स्पर्धेमध्ये एकूण ५४ शाळांनी सहभाग घेतला होता. त्यामधील लहान व मोठ्या दोन्ही गटांतून प्रत्येकी १० शाळांची अंतिम फेरीसाठी निवड केली गेली.सहावी ते दहावी या मोठ्या गटात मॉर्डन स्कूल वाशीच्या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकाविला.

महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे, प्रसिद्ध संगीतकार राहुल रानडे,अभिनेते नृत्य कलावंत नकुल घाणेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत वाशीतील विष्णुदास भावे नाट्यगृहात पारितोषिक वितरण करण्यात आले.



**पनवेल : जय हनुमान क्रिकेट क्लब मैदान, खारकोपरच्या वतीने होळी चषक २०२५चे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त माजी पं.स. सदस्य रत्नप्रभा घरत, अॅड. राहुल घरत यांची उपस्थिती लाभली. या वेळी आयोजकांनी त्यांचे स्वागत केले.**

# राज्यस्तरीय कायाकल्प टीमची उरणच्या ग्रामीण रुग्णालयाला भेट

**उरण : बातमीदार**

इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय उरण येथे राज्यस्तरीय कायाकल्प टीमनी भेट दिली. यामध्ये डॉ. मिथुन खेरडे, डॉ. अमृता मॅथ्यु व डॉ. किरण शिंदे व श्रीम. वावरे सिस्टर यांनी भेट दिली. या वेळी डॉ. बाबासो काळेल वैद्यकिय अधिक्षक, डॉ. मृणालिनी कदम, डॉ. प्रकाश हिमगिरे तसेच रुग्णालयाचे सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



या दिवशी राज्यस्तरीय टीमने सुरुवातीला इंदिरा गांधी रुग्णालयातील बाहेरील स्वच्छता, कंपाऊड, बगीचा, पोस्ट मार्टम रुम, निर्लेखन रुम, रुग्णवाहीका स्वच्छता, पार्किंगची पाहणी केली. त्यानंतर रुग्णालयातील औषध वितरण विभाग, औषध साठा रुम, आयुष विभाग, वैदयकिय अधिकारी विभाग इंजेक्शन विभाग, कार्यालय, प्रयोगशाळा विभाग, दंत विभाग, सर्व शौचालयाची स्वच्छता, ऑपरेशन थेटर, प्रसुती कक्ष, महिला वार्ड, पुरुष वार्ड, टीबी विभाग, मलेरिया विभाग, आरबीएसके विभाग, आयसीटीसी व लिंक एआरटी विभाग, डोळे तपासणी विभाग, अशा सर्व प्रकारच्या विभागात जावुन टीमने संबधीत विभागाच्या कर्मचा–याच्या कामाची माहिती, सर्व रजिस्टरची तपासणी व स्वच्छतेची पाहणी केली.

या टीमने रुग्णालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या कामाचे समाधान व्यक्त केले. तसेच आणखी सुधारणा करण्यासाठी काही सुचनासुध्दा देण्यात आल्या.तसेच वैदयकिय अधिक्षक डॉ. बाबासो काळेल यांनी केलेल्या कामाचे कौतुक करण्यात आले.

# केबीपी कॉलेजमध्ये राष्ट्रीय चर्चासत्र उत्साहात

**नवी मुंबई : बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील (केबीपी) कॉलेजमध्ये दि. ११ व १२ मार्च रोजी अर्थशास्त्र विभागाच्या वतीने ' शाश्वत व सर्वसमावेशक विकसित भारत २०४७च्या दिशेने ' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. चर्चासत्राचे उदघाटन पद्मश्री शरद काळे यांच्या हस्ते करण्यात आले.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शुभदा नायक यांनी प्रास्ताविक व मान्यवरांचे स्वागत केले.पद्मश्री शरद काळे यांनी भारतातील सद्य स्थितीवर भाष्य करताना पर्यावरणीय साधन संपत्तीचा व मानवी जीवनाचा परस्पसंबंध उलगडून सांगितला. तसेच पर्यावरणीय साधन संपत्तीचा विनियोग करताना जागृकता महत्वाची आहे असे प्रतिपादन केले. यावेळी त्यांनी



विविध संदर्भ व दाखले देऊन मानवाच्या दैनंदिन जीवन व्यवहारावर प्रकाश टाकला. विकसित भारतासाठी विकास आणि पर्यावरण यामधील संतुलन राखणे तसेच व्यक्तिगत आणि सामूहिक प्रयत्न आवश्यक आहेत. असे मत व्यक्त केले.

प्रज्ञा कालिया यांनी विकसित भारतासाठी अचूक धोरणे व सुधारणा महत्वाच्या आहेत. तसेच त्यांनी शिक्षण, तंत्रज्ञान, ऊर्जा आणि आर्थिक समावेशकता यासंबंधी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. यावेळी विविध प्राध्यापकांनी पाठवलेल्या शोधनिबंधपर पुस्तकांचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.या चर्चासत्रात महाराष्ट्रातील विविध जिल्हयातून तसेच गुजरात, चंदीगढ, पंजाब व पश्चिम बंगाल येथून प्राध्यापक सहभागी झाले होते. सुमारे २५०हून अधिक प्राध्यापकांनी चर्चासत्रात सहभाग नोंदवला.

पाहुण्यांची ओळख उपप्राचार्या डॉ. राजेश्री घोरपडे यांनी करून दिली. सूत्रसंचालन प्रियांका पांडे यांनी तर आभार सुहाली जाधव यांनी मानले. सदर चर्चासत्र यशस्वी करण्यासाठी अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. हर्षद जाधव व सहकाऱ्यांनी विशेष प्रयत्न केले.

# नवी मुंबईत पर्यावरणपूरक धूळवड साजरी

**नवी मुंबई : बातमीदार**

होळीचा पुरेपर आनंद घेत नवी मुंबईत ठिकठिकाणी धुलिवंदन साजरे करण्यात आले. रंगांची उधळण त्यासोबत मनसोक्त पाण्यात भिजण्याचा आस्वाद नागरिकांनी घेतला. अनेकांनी पर्यावरण पुरक होळी साजरी करण्यास प्राधान्य देत, पाणी बचतीचादेखील संदेश दिला.



एकमेकांना नैसर्गिक रंग लावत होळीच्या शुभेच्छा दिल्या जात होत्या. आजूबाजूच्या इमारतींमध्ये एकमेकांवर फुगे पोडण्याची स्पर्धा लागलेली दिसून आली. शासनाचे, सामाजिक संघटनांचे पाणी वाचवण्याचे वर्तमान पत्रात, इलेक्ट्रॉनिक मीडियातून केले जाणारे आवाहन बरेचसे मनावर घेतलेले अनेक ठिकाणी दिसून आले. अनेकांनी सुक्या व रासायनिक रंगांना टाळून पर्यावरणपुरक रंगांची उधळण करत धुलीवंदन साजरे केले. बच्चे कंपनीने मात्र यथेच्छ पाण्यात डुंबण्याचा व ओले रंग खेळण्याचा आनंद लुटला.

नेमके धुलिवंदन शुक्रवारी आल्याने अस्सल खवय्यांची मांसाहारावर ताव मारणाऱ्यांची चांगलीच चंगळ पहायला मिळाली. नेहमीच्या सरासरीपेक्षा दुप्पट तिप्पट ६० कोंबड्या विक्री झाल्याचे विक्रेत्यांनी सांगितले.

# महागाव येथील जंगलात वणवा

## स्थानिकांनी तत्परता दाखवल्याने मोठा अनर्थ टळला



**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील विविध भागात, रानावनात, डोंगर, जंगल भागात सध्या मोठ्या प्रमाणावर वणवे लागत आहेत. भरउन्हात हे वणवे भडकून जैवविविधता नष्ट होत आहे. सुधागड तालुक्यात वनव्यांचे प्रमाण अधिक दिसून येत आहे. तालुक्यातील महागाव येथे जंगलात शुक्रवारी (दि. १४) मोठा वणवा लागला होता. स्थानिकांनी प्रसंगावधानता दाखवत हा वणवा वेळीच विझवला. त्यामुळे मोठा अनर्थ टाळला. तसेच जंगलातील मोठ्या प्रमाणातील नुकसान टाळण्यात यश मिळाले.

महागाव वन कमिटीचे अध्यक्ष प्रदीप कांबळे, तसेच किरण खंडागळे व त्यांचे सहकारी यांनी मिळून हा वणवा विझवला. या वेळी त्यांच्याकडे कोणतीही आवश्यक साधन सामग्री उपलब्ध नव्हती, मात्र झाडांच्या फांद्यांद्वारे अथक परिश्रमाने त्यांनी या वणव्यावर नियंत्रण मिळवले. हा वणवा वेळीच विझवला गेला नसता तर जंगलातील महत्त्वपूर्ण झाडे तसेच पशुपक्ष्यांचा अधिवास, खाद्य व निवारा नष्ट झाला असता. स्थानिकांनी दर्शविलेल्या प्रसंगावधानतेबद्दल वनविभाग आणि पर्यावरणप्रेमींनी त्यांचे अभिनंदन केले. या घटनेमुळे जंगलातील आगीच्या धोक्यांवर लक्ष ठेवण्याची गरज पुन्हा एकदा जाणवली आहे.

# सुएसो शैक्षणिक संस्थेचा कारभार ओसवाल व लिमये एकत्रितच पाहणार

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड एज्युकेशन सोसायटी, पाली ही संस्था गेली अनेक दशकापासून रायगडसह नवी मुंबईत ज्ञानदानाचे पवित्र कार्य करीत आहे. शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये यांनी सन १९४१मध्ये लावलेल्या या शिक्षण संस्थेच्या रोपट्याचे रूपांतर आता वटवृक्षात झालेले आहे. सद्यस्थितीत स्व. वसंतराव ओसवाल यांच्यानंतर संस्थेचे अध्यक्षपद हे रिक्त झालेले आहे. आता सुएसो शैक्षणिक संस्थेचा कारभार ओसवाल व लिमये एकत्रितच पाहणार असल्याचे प्रतिपादन संचालक मंडळातील पदाधिकारी व स्व. वसंतराव ओसवाल यांच्या कन्या गीता पालरेचा यांनी केले.

पाली येथील कार्यालयात शनिवारी (दि. १५) घेतलेल्या पत्रकार परिषदेत पालरेचा व संचालक मंडळातील पदाधिकाऱ्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. सुएसोच्या रिक्त असलेल्या अध्यक्ष व सचिव पदाच्या निवडीसाठी २३ मार्च रोजी संचालक मंडळाची महत्त्वपूर्ण



**गीता पालरेचा यांचे प्रतिपादन**

बैठक पालीत आयोजित केली असून या बैठकीत सर्वानुमते व लोकशाही पद्धतीने रिक्त पदांची निवड करण्यात येणार असल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.

शिक्षणमहर्षी दादासाहेब लिमये यांनी वसंतराव ओसवाल यांच्यावर त्या काळी अत्यंत विश्वासाने सोपवलेली जबाबदारी त्यांनी प्रामाणिकपणे व कर्तव्ये तत्परतेने पार पाडली. ही शैक्षणिक संस्था नावारूपाला यावी यासाठी ओसवाल यांचे योगदान मोठे व अतुलनीय राहिले आहे. शिक्षणमहर्षी स्व. दादासाहेब लिमये, स्व. वसंतराव ओसवाल यांना अभिप्रेत असलेले शैक्षणिक काम, सेवाभाव व सामाजिक बांधिलकीचा विचार व वारसा जोपासणारे कार्य आम्ही सर्व संचालक मंडळ एकमताने व एकदिलाने करू, अशी ग्वाही गीता पालरेचा यांनी दिली.

ज्येष्ठ पदाधिकारी प्रकाश कारखानीस, ग.रा.म्हात्रे, रमेश साळुंके यांनी, सुधागड एज्युकेशन शैक्षणिक संस्थेचे कामकाज आजवर पारदर्शक पद्धतीने व सर्व संचालक मंडळ यांच्या एकमुखी निर्णयाने होत आले आहे. संस्थेच्या कामकाजात कधीही कोणतीही गटबाजी व राजकारणाचा एक अंशही दिसून आला नाही. यापुढेदेखील शैक्षणिक उद्देश ठेवूनच हे कार्य निरंतर सुरू राहील, असे स्पष्ट केले.

# माथेरानमध्ये मोबाईलच्या वादातून एकाची हत्या

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान येथील रेल्वे गेस्ट हाऊसमध्ये स्वच्छतेच्या कामासाठी असलेल्या कामगारांमध्ये मोबाईलवरून वाद झाला व त्यातून एका कामगाराची हत्या झाली असल्याची घटना घडली. या प्रकरणी माथेरान पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले आहे.

माथेरानमध्ये रेल्वे प्रशासनाचे अधिकारी विश्रामगृह आहे. येथे येणाऱ्या अधिकारी आणि पाहुणे यांच्या सेवेसाठी चार कर्मचारी ठेवले आहेत. होळी सण साजरा होत असताना रात्री उशिरा प्रेम किशन पाल याने सुशांत सुनील गेजगे याचा मोबाईल फोन घेतला होता. सुशांत फोन परत मागत असल्याने प्रेम आणि दिनेश तिवारी यांनी फोन परत न दिल्याने त्यांच्यामध्ये वाद झाला. या वादाचे रूपांतर शिवीगाळ आणि नंतर हाणामारीत झाले. प्रेम आणि दिनेश यांनी मनामध्ये राग धरून संगनमत करून धारदार हत्याराने सुशांतच्या पोटावर आणि छातीवर वार केले.

दुसऱ्या दिवशी पहाटे सफाई कामगाराने सुशांत गेजगे याला उठविण्याचा प्रयत्न केला असता याने काहीच हालचाल केली नसल्याने इतर कर्मचारी आणि रेल्वे पोलिसांना कळवले गेले. रुग्णालयात घेऊन गेले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

पोलिसांनी याबाबत प्रेम पाल आणि दिनेश तिवारी यांच्या दोघांवर गुन्हा दाखल केला असून त्यांना अटक केली आहे. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

# कोळी बांधवांची मंत्री नितेश राणेंशी चर्चा

## साळाव ते रेवदंडा नवीन पूल निर्मितीत नुकसानभरपाईची मागणी मान्य

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवस रेड्डी या महामार्गात साळाव ते रेवदंडा नवीन पुलाचे बांधकाम होत आहे. या नवीन पूल निर्मितीत कुंडलिका समुद्र खाडी मच्छीमार कोळी बांधवांच्या व्यवसायाचे नुकसानीची समस्या आहे. या संदर्भात आमदार महेंद्र दळवी यांनी मच्छीमार, कोळी बांधवांची मंत्रालयात मत्स्य व बंदर विकासमंत्री नितेश राणे यांच्याशी संवाद–चर्चा घडवून आणली.

या वेळी मंत्री नितेश राणे यांनी साळाव ते रेवदंडा नवीन पूल निर्मितीत कोळी बांधवांना नुकसानभरपाई देण्याची हमी दिली.

अलिबाग व मुरूड तालुक्यातून रेवस–रेड्डी या नुतन महामार्गाचे बांधकाम लवकरच सुरू होत आहे. या मार्गात कुंडलिका समुद्र खाडीवर साळाव–रेवदंडा पूल नव्याने बांधण्यात येत आहे. अशा वेळी रेवदंडा व परिसरातील कुंडलिका समुद्र खाडीत मच्छीमार, कोळी बांधवांची जाळी तुटणे, खांब उपटणे आदी विविध नुकसान होण्याची संभवना आहे. संभाव्य नुकसानाची दखल शासनाने घ्यावी यासाठी रेवदंडा विभाग व पंचक्रोशीतील कोळी बांधवांनी आमदार महेंद्र दळवी यांच्याशी संपर्क केला व समस्येचे निवेदन दिले.

आमदार महेंद्र दळवी यांनी रेवदंडा विभाग कोळी बांधवांसह मंत्रालयात मत्स्य व बंदर विकासमंत्री नितेश राणे यांची भेट घेऊन संवाद साधून चर्चा घडवून आणली. या वेळी नवीन पूल निर्मितीत कोळी बांधवांच्या होणाऱ्या नुकसानीची भरपाई शासनाच्या वतीने मिळवून देण्याची हमी मंत्री नितेश राणे यांनी उपस्थित कोळी बांधवांना दिली. त्याबद्दल मंत्री राणे आणि आमदार दळवी यांचे कोळी बांधव, मच्छीमारांनी आभार व्यक्त केले.

# माथेरानच्या बोहरा समाजाकडून सामाजिक सलोखा

**माथेरान : प्रतिनिधी**

सध्या मुस्लिम व बोहरा बांधवांचे पवित्र रमजान महिन्यातील रोजे सुरू असून रमजान महिन्याला या दोन्ही धर्मात मोठे स्थान आहे. माथेरानमधील अंजुमन सैफी दाऊदी बोहरा समाज बांधवांच्या १३व्या रोजाचे औचित्य साधत बुऱ्हान विला बंगल्यात बोहरा समाजाचे धर्मगुरू डॉ. सय्यदना मोफदल सैफुद्दीन यांच्या मार्गदर्शनाखाली हिंदू बांधवांसोबत इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते.

दाऊदी बोहरा समाज हा जगभरातील ४०हून अधिक देशांमध्ये राहणारा मुस्लिम समुदाय आहे व त्यांचे नेते डॉ. सय्यदना मुफद्दल सैफुद्दीन यांच्या मार्गदर्शनाखाली बोहरा समाज बांधव हे सामान्यत: सुशिक्षित व्यावसायिक आणि विविध क्षेत्रातील पात्र व्यावसायिक आहेत त्यांच्या विशिष्ट संस्कृतीमुळे ते त्यांच्या परंपरांशी प्रामाणिक राहून आधुनिकता स्वीकारण्याचा



**रमजाननिमित्त हिंदू बांधवांसोबत इफ्तार पार्टी**

प्रयत्न करत असतात आणि सक्रिय शांतप्रिय आणि कायद्याचे पालन करणारे या समाजाचे नागरिक असतात, जे संपूर्ण मानवतेच्या कल्याणासाठी समर्पित होत असतात. या समाजाच्या सर्वच धर्मगुरूंचे माथेरान पर्यटनस्थळावरील शांतता व आल्हादायक वातावरण येथील निसर्गामुळे या ठिकाणी अधिक सहवास तसेच आकर्षण राहिले आहे. बोहरा समाजाचे धर्मगुरू डॉ. सय्यदना मुफद्दल सैफुद्दीन यांच्या मार्गदर्शनाखाली समाजाच्या प्रगतीसाठी येथे सामाजिक हिताचे अनेक उपक्रम हाती घेतले जातात.

यामध्ये बोहरा समाजाच्या वतीने वृक्षारोपण, स्वच्छता अभियान असे अनेक सामाजिक बांधिलकी जपणारे उपक्रम राबविले जातात या ठिकाणी दरवर्षी न चुकता पवित्र रमजान महिन्यात जातीय सलोखा तसेच राष्ट्रीय एकात्मता जपण्याच्या दृष्टिकोनातून माथेरानच्या अंजुमन सैफी दाऊदी बोहरा समाजाच्या वतीने येथील हिंदू बांधवासोबत इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात येते. यंदादेखील समाजाच्या बांधवांनी इफ्तार पार्टीचे शानदार आयोजन केले होते. आलेल्या मान्यवरांना भेटवस्तू देऊन येथोचित सन्मान करत पारंपरिक वेगवेगळ्या जिन्नसांसह भोजनाची मेजवानी देऊन आदरतिथ्य करण्यात आले.

या वेळी भाजप माथेरान शहराध्यक्ष प्रवीण सपकाळ, माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर, माजी उपनगराध्यक्ष आकाश चौधरी, चंद्रकांत जाधव, माजी नगरसेवक प्रदीप घावरे, शिवाजी शिंदे, किरण चौधरी, शैलेश चाफेरकर, सुनील शिंदे, रायगड प्रेस क्लबचे संघटक दिनेश सुतार, मिलिंद कदम आदी उपस्थित होते.

इफ्तार पार्टीचे आयोजन करताना अंजुमन सैफी दाऊदी बोहरा समाज माथेरान अध्यक्ष जुजर मुल्ला सैफुद्दीन, फिरोज मालवावाला, अब्बास राणीयावाला, अब्बास उदयपूरवाला, मुस्तफा माथेरानवाला, मुर्तुजा माथेरानवाला, अब्दुल कादिर माथेरानवाला, युसुफ नेरळवाला, इस्माईल मालवावाला, बुरानुद्दीन माथेरानवाला तसेच बुरान विल्ला बंगल्याचे व्यवस्थापक अब्बासभाई कमरी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# घरकुलापासून लाभार्थी वंचित राहता कामा नये -आमदार थोरवे

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात १८३० घरकुले एका आर्थिक वर्षात मंजूर झाली आहेत. त्या सर्व लाभार्थी यांना पैशाचे हप्ते मिळवून देण्यात कोणत्याही अडचणी येऊ नयेत असे आचरण तालुक्यातील प्रत्येक अधिकारी आणि कर्मचाऱ्याचे असावे. कर्जत, खालापूर तालुक्यातील एकही गोरगरीब स्वतःच्या घरापासून वंचित राहता कामा नये, असे आमदार महेंद्र थोरवे यांनी निर्देशित केले आहे.

कर्जत तालुक्यातील प्रधानमंत्री घरकुल आवास योजनेचा भूमिपूजन सोहळा वावळोली ग्रामपंचायतीमध्ये आयोजित करण्यात आला होता. तालुक्यात रायगड जिल्ह्यातील सर्वाधिक दुसऱ्या क्रमांकाची १८३० घरकुल मंजूर झाले आहेत. त्यातील वावळोली ग्रामपंचायत हद्दीत ३० घरकुले मंजूर आहेत. कर्जत पंचायत समितीतर्फे या लाभार्थ्यांना घरकुलांच्या मंजुरीपत्राचे वाटप करण्यात आले. या वेळी आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते लाभार्थी पद्माकर काशिनाथ ठोंबरे तसेच जगदीश काशिनाथ ठोंबरे यांच्या घरकुलाचे भूमिपूजन करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते.




या कार्यक्रमास पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुशांत पाटील, सरपंच एकनाथ भगत, उपसरपंच विद्या खानविलकर, विस्तार अधिकारी विजय रजपूत, ग्रामपंचायत अधिकारी धनंजय देशमुख, पंकज पाटील, ग्रामपंचायत सदस्य नेहा थोरवे, संतोष हिलम, मोरेश्वर भगत, हर्षदा विचारे, हरिश्चंद्र कांबेरे, दीपक घरत, निलेश थोरवे, मोरेश्वर भगत, विश्वनाथ घरत, चंद्रशेखर चंचे आदी उपस्थित होते.

आमदार महेंद्र थोरवे म्हणाले की, ज्या योजना राज्य शासनाच्या, केंद्र शासनाच्या आहेत त्या जनतेपर्यंत पोहचवण्याचे काम केले जाईल.

गटविकास अधिकारी सुशांत पाटील यांनी तालुक्यात मंजूर झालेली सर्व घरकुले तीन महिन्यात पूर्ण झाली पाहिजेत, अशा सूचना केल्या. घरकुल आणि शौचालय यांच्यासाठी एक दीड लाखाचे अनुदान मंजूर आहे. त्यातील पहिला हप्ता लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा झाला आहे. तालुक्यातील सर्व घरकुले वेळेत पूर्ण व्हावीत यासाठी कर्जत पंचायत समिती पुढील काळात दक्ष राहणार असल्याचे आश्वासनही पाटील यांनी दिले.

# मुरूड कोळीवाड्यात शिमगोत्सव उत्साहात



**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड परिसरात होळी सण मोठ्या उत्साहात साजरा झाला. मुरूड कोळीवाड्यात पारंपरिक वेशात, वाद्याच्या तालात होळीचे विधीवत पूजन करून रात्री १२ वाजता होलिका दहन झाले, तर दुसऱ्या दिवशी धुळवड रंगली.

मुरूड तालुक्यात शिमगा अर्थात होळीचे थोडे वेगळे रूप पहायला मिळते. होळी सण प्रामुख्याने कोळी समाजात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. प्रथेनुसार १५ दिवस अगोदर होळीच्या माळावर छोट्या होळीसाठी खड्डा खणून त्यात रात्री सुपारीचे झाड जाळले जाते. लहान मोठे सर्वच होळीच्या सणात सहभागी होतात.

होळीच्या दिवशी सुपारीचे झाड वाजत गाजत आणले जाते. या वेळी बाजारात वाद्याच्या तालावर उंच उड्या मारण्याची स्पर्धा लागते. एका झाडासोबत २५ हौशी मुले असतात. खेळ बाजारात विविध ठिकाणहून आलेल्या म्हणजे आगरदांडा, खारआंबोली, उंडरगाव, डोंगरी अशा गावच्या होळी येऊन हवेत उंच उडवतात. हे पाहण्यासाठी मुरूडकर मोठ्या संख्येने बाजारात जमतात. विशेष म्हणजे विदेशी पर्यटक याचे चित्रण करण्यासाठी खास मुरूडला भेट देतात.

शिमगा सणाचा सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे कोळीवाड्यातील होळी दहन. यानिमित्ताने कोळीवाडे विद्युत रोषणाईने सजतात. घरातील महिला कोळी वेषभूषा परिधान करून होळीच्या पटांगणात होळीभोवती ढोल ताशाच्या तालात फेर धरतात. इतर समाजाच्या महिला होळीचे पूजन करतात आणि नवस बोलतात अशी परंपरा आहे. पूजन झाल्यावर संपूर्ण समाज एकत्र येऊन मंत्रोच्चारात होळी पेटवली जाते.




**रोहे : होळी सण शहरासह ग्रामीण भागात उत्साहात साजरा करण्यात आला. मुंबईकर चाकरमानीसुद्धा यानिमित्ताने गावी आले होते. होळी पेटवल्यानंतर दुसऱ्या दिवशी धुळवळीचा आनंद लहान मुलांसह सगळ्यांनी घेतला.**

# भारत विरुद्ध वेस्ट इंडिज संघात आज अंतिम सामना; सचिन-लारा द्वंद्व!

**रायपूर : वृत्तसंस्था**

इंडिया मास्टर्स विरुद्ध वेस्ट इंडिज मास्टर्स या दोन संघांमध्ये इंटरनॅशनल मास्टर्स लीग टी-२० अंतिम सामना हा रायपूरच्या शहीद वीर नारायण सिंह आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळवण्यात येणार आहे. या सामन्याला रविवारी (दि. १६) सायंकाळी ७ वाजून ३० मिनिटांनी सुरुवात होईल. क्रिकेटच्या मैदानात मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर विरुद्ध ब्रायन लारा असा फायनल सामना रंगल्याचे पहायला मिळणार आहे. इंटरनॅशनल मास्टर्स लीग टी-२० स्पर्धेतील २०२५च्या हंगामात पहिल्या सेमी फायनलमध्ये सचिन तेंडुलकरच्या नेतृत्वाखालील इंडिया



मास्टर्स संघाने ऑस्ट्रेलियाचा ९४ धावांनी धुव्वा उडवत फायनल गाठली. या सामन्यात सचिनसह युवराज सिंगचा जलवा पाहायला मिळाला. त्यानंतर दुसऱ्या सेमी फायनलमध्ये ब्रायन लाराच्या नेतृत्वाखालील वेस्ट इंडिज मास्टर्स संघाने श्रीलंकेला पराभूत करत फायनल गाठली आहे.

इंटर नॅशनल मास्टर्स लीग टी-२० स्पर्धेत दिग्गज क्रिकेटर पुन्हा एकदा क्रिकेटच्या मैदानात उतरल्याचे पहायला मिळाले. इंड़िया मास्टर्स आणि वेस्ट इंडिज मास्टर्स या फायनलिस्टशिवाय ऑस्ट्रेलिया, श्रीलंका, दक्षिण आफ्रिका आणि इंग्लंड असे एकूण सहा संघ या स्पर्धेत सहभागी झाले होते. दक्षिण आफ्रिका आणि इंग्लंडचा खेळ साखळी फेरीत खल्लास झाला. त्यानंतर सेमी फायनलमध्ये ऑस्ट्रेलिया आणि श्रीलंकेचा स्पर्धेतील प्रवास संपुष्टात आल्याचे पहायला मिळाले. आता इंडिया मास्टर्स विरुद्ध वेस्ट इंडिज मास्टर्स यांच्यात जेतेपदाची लढाई पहायला मिळेल. क्रिकेट चाहत्यांना तेंडुलकर विरुद्ध लारा यांच्यात पुन्हा एकदा आमना सामना पाहण्याचा अनुभव मिळणार आहे. फायनमध्ये भारतीय संघाचे पारडे जड दिसते. संघ विजेतेपदाचा दावेदार मानला जातोय.

# रोहितच भारताचा कसोटी कर्णधार?

## इंग्लंडविरुद्ध कसोटी मालिकेसाठी नेतृत्व करण्याची चिन्हे

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय संघाने रोहित शर्माच्या नेतृत्त्वाखाली अवघ्या १० महिन्यांच्या कालावधीमध्ये दुसरी आयसीसी ट्रॉफी आपल्या नावे केली आहे, पण गेल्या वर्षी कसोटी कामगिरीत कर्णधार रोहित शर्माची कामगिरी चांगली राहिलेली नाही. त्यामुळे भारताचा कसोटी कर्णधार बदलणार का, अशा चर्चा सुरू होत्या, मात्र अपडेटनुसार रोहितच कर्णधार असल्याची माहिती समोर आली आहे.



वृत्तानुसार दुबईत भारताने चॅम्पियन्स ट्रॉफी फायनल जिंकल्यानंतर जून-ऑगस्टमध्ये इंग्लंड दौऱ्यासाठी रोहित शर्मा कसोटी कर्णधार राहील, अशी खात्री देण्यात आली आहे. एका महिन्यापूर्वी बॉर्डर-गावसकर ट्रॉफीच्या वेळी यापुढे भारताच्या कसोटी क्रिकेट नेतृत्व कोण करणार या चर्चांनाही पूर्णविराम मिळाला आहे.

चॅम्पियन ट्रॉफीच्या विजयानंतर रोहित शर्माच्या कारकिर्दीत मोठे वळण आले आहे. वृत्तानुसार रोहितला आणखी एका मोठ्या दौऱ्यावर संघाचे नेतृत्व करण्यासाठी भारतीय क्रिकेट नियामक मंडळ आणि निवड समितीचा पाठिंबा मिळाला आहे.

भारतीय संघाने इंग्लंडमध्ये शेवटची मालिका २००७मध्ये जिंकली होती. जेव्हा संघाचे कर्णधारपद राहुल द्रविड यांच्याकडे होते. द वॉल या नावाने ओळखल्या जाणाऱ्या क्रिकेटपटूच्या चिकाटीबद्दल फार काही सांगण्याची गरज नाही. या संघात भारताचे महान कसोटीपटू सचिन तेंडुलकर, सौरव गांगुली, अनिल कुंबळे, व्हीव्हीएस लक्ष्मण आणि झहीर खान यांचा समावेश होता. पुढे भारतीय संघ ऑस्ट्रेलियात जिंकला, पण इंग्लंड दीड दशकांहून अधिक काळ अपराजित राहिला आहे. आता रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली संघातही विराट कोहली, जसप्रीत बुमराह, रवींद्र जडेजा आणि केएल राहुलसारखे चांगले कसोटीपटू आहेत.

### अनेक पर्याय, पण हिटमॅनवर विश्वास!

भारताकडे यशस्वी जैस्वाल, अभिषेक शर्मा, शुबमन गिल, संजू सॅमसन आणि केएल राहुलसारखे अनेक सलामीवीर फलंदाजीचे पर्याय आहेत, पण कर्णधार रोहितसारखे धोरणात्मक कौशल्य कोणाकडे नाही. त्याच्याकडे संयम आहे, जो आधुनिक काळातील आताच्या क्रिकेट कर्णधारांमध्ये ही एक दुर्मिळ गुणवत्ता आहे. कसोटी क्रिकेटमध्ये कठीण काळात वेटिंग गेम खेळण्याची एक कला त्याच्यात आहे.

# नागोठणे क्रिकेट असोसिएशन प्रीमिअर लीगचे उद्घाटन

## आठ संघांमध्ये सामन्यांचा थरार



**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे क्रिकेट असोसिएशन प्रीमिअर लीग वेलशेत येथील मैदानावर १५ व १६ मार्च अशी दोन दिवस आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेचे उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत झाले.

नागोठणे क्रिकेट असोसिएशन प्रतिवर्षी विभागातील क्रिकेट रसिकांसाठी क्रिकेट खेळाची मेजवानी देत असते. असोसिएशनचे अध्यक्ष राजेश पिंपळे व कार्याध्यक्ष किशोर म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली शिस्तबद्ध, व खिलाडूवृत्तीने व शांततेत स्पर्धा होत असतात. सालाबादप्रमाणे यंदाही वेलशेत येथील भव्य मैदानावर नागोठणे क्रिकेट असोसिएशन प्रीमिअर लीग खेळली जात आहे.

स्पर्धेत जय/भावार्थ (संघ मालक किशोर म्हात्रे व सोपान जांबेकर), वणी फायटर्स (संघ मालक अरुण घोगरे व किशोर मांडलुस्कर), दैवी प्रिन्स इलेव्हन वरवठणे (संघ मालक विशाल म्हात्रे), मातोश्री इलेव्हन नागोठणे (संघ मालक मंदार निंबाळकर व रोनिक झेमसे), एस.के. इलेव्हन वेलशेत (संघ मालक संतोष कोळी), एस.टी. पाटील कन्स्ट्रक्शन (संघ मालक सुभाष पाटील), विधी इंटरप्रायजेस मुरावाडी (संघ मालक अखिल ताडकर व अमोल ताडकर), पारस इलेव्हन मुरावाडी (संघ मालक अरुण चोगले) या संघांनी सहभाग घेतला आहे.

उद्घाटन समारंभाला राष्ट्रवादीचे नेते विलास चौलकर, पिगोंडे सरपंच तथा राष्ट्रवादीचे नागोठणे विभाग अध्यक्ष संतोष कोळी, भाजप नेते किशोर म्हात्रे, जिल्हा उपाध्यक्ष सोपान जांबेकर, युवक राष्ट्रवादी विभागीय अध्यक्ष दिनेश घाग, राजेश पिंपळे, वेलशेत गाव कमिटी अध्यक्ष अनिल पाटील, सुरेश जोशी, गंगाराम पारंगे, अरुण चोगले, अमोल ताडकर, सुभाष मढवी, प्रमोद चोगले, सुनील बडे, हृषिकेश पाटील, सुधीर भोय, प्रभाकर ताडकर, प्रभाकर धुमाळ आदींसह खेळाडू व क्रिकेटप्रेमी उपस्थित होते. सूत्रसंचालन समलोचक राहुल ताडकर यांनी केले.

# अरुण पाटील 'रायगड श्री'चा मानकरी




**अलिबाग : प्रतिनिधी**

जय हनुमान व्यायाम शाळा बेलपाडा कावाडेतर्फे रायगड जिल्हास्तरीय शरीरसौष्ठव स्पर्धेत ए.पी.फिटनेस पोयनाडचा अरुण पाटील रायगड श्री किताबाचा मानकरी ठरला. खारेपाट श्री किताब पोयनाडच्याच जयेश म्हात्रे याने पटकाविला, तर मेन फिजीक्समध्ये जयेश म्हात्रे (एच आर फिटनेस) याने बाजी मारली.

स्पर्धेला कोकण बॉडीबिल्डिंग आणि फिजिक्स स्पोर्ट्स वेल्फेअर असोसिएशनचे ॲड. किरण कोसमकर, सचिव सचिन पाटील, सहसचिव अनिकेत कदम, शरद म्हात्रे, सुनील भोईर, दर्शन जाधव, प्रतिक पाटील, प्रसाद सावंत, राकेश बंग, संदीप बंग तसेच खारेपाट व अलिबाग तालुक्यातील विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी उपस्थित होती. स्पर्धेत खारेपाट विभागासह अलिबाग तालुका व रायगड जिल्ह्यातील नामवंत स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.

# सुपर ओव्हरमध्ये संघाचे खातेच उघडले नाही!

**क्वालालंपूर : वृत्तसंस्था**

टी-२० क्रिकेट जगभरात लोकप्रिय ठरताना दिसते. क्रिकेटच्या छोट्या फॉर्मेटमध्ये तुफान फटकेबाजीचा नजराणा दाखवत अनेकदा खेळाडू आणि संघ मोठे विक्रम प्रस्थापित करतानाही दिसून येते, पण एका आंतरराष्ट्रीय टी-२० सामन्यात सुपर ओव्हरचा थरार रंगल्यावर एक लाजिरवाणा विक्रम झाला.

बहरीन संघाने सामना टाय झाल्यानंतर अर्धी सुपर ओव्हर खेळून संघाला खातेही उघडता आले नाही. परिणामी समोरच्या हाँगकॉग संघाला एक धावेचे टार्गेट मिळाले. याआधी असे कधीच घडले नव्हते. मलेशियात सुरू असलेल्या तिरंगी मालिकेत हा प्रकार घडला. हाँगकाँगच्या संघाने एक धाव करत हा सामना अगदी सहज खिशात घातला.

# मुरूडच्या सलोनी नाक्तीची मुंबई महिला कबड्डी संघात निवड

**मुरूड : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने व ठाणे जिल्हा कबड्डी असोसिएशन आयोजित महिला गटाची राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धा येत्या १९ ते २३ मार्चदरम्यान ठाणे येथे होणार आहे. या स्पर्धेत मुंबई शहर कबड्डी असोसिएशन जिल्हा अजिंक्यपद व चाचणी कबड्डी स्पर्धेतून मुंबई शहरच्या महिला संघात मुरूड तालुक्यातील तेलवडे गावची कन्या सलोनी नाक्ती हिची निवड झाली आहे.



तेलवडे येथील गरीब घराण्यातील सलोनी नाक्ती हिला घरात कबड्डीचा कोणत्याही वारसा नसताना प्राथमिक शाळेपासून तिला कबड्डी खेळण्याची आवड होती. त्याचे चीज झाले आहे.

याआधी सलोनीची मुंबई शहर कुमारी गट संघाच्या कर्णधारपदी निवड झाली होती. त्या वेळी तिने उत्तमपणे कर्णधारपद भूषविले. या कामगिरीमुळे तिला खुल्या गटात स्थान देण्यात आले. या निवडीमुळे सलोनीचे कौतुक होत आहे.

# फोनवरून धमक्या, पाठलाग, अपयश अन् नैराश्य!

## क्रिकेटपटू वरुण चक्रवर्तीने सांगितला धक्कादायक अनुभव

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट संघातील फिरकीपटू वरुण चक्रवर्तीने नुकत्याच झालेल्या चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये दमदार प्रदर्शन केले होते. चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये सर्वाधिक बळी घेणारा तो दुसऱ्या क्रमाकांचा गोलंदाज ठरला. या कामगिरीमुळे चर्चेत आलेल्या वरुणने त्याच्याबद्दलचा एक धक्कादायक अनुभव कथन केला आहे.

आपल्या वाईट दिवसांची आठवण सांगताना तो म्हणाला की, २०२१ साली टी-२० विश्वचषकात खराब कामगिरी केल्यानंतर त्याला फोनवरून धमक्या मिळाल्या होत्या. भारतात परत येऊ नको, अशी धमकी त्याला मिळाली होती तसेच त्याचा विमानतळावरून घरापर्यंत पाठलाग केला गेला, असेही त्याने सांगितले.

२०२१ साली झालेल्या टी-२० विश्वचषकात वाईट कामगिरी केल्याबद्दल वरुण चक्रवर्तीला क्रिकेट संघातून वगळण्यात आले होते. यानंतर आता आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पुनरागमन होईल की



नाही? अशी चिंता त्याला सतावत होती. आयपीएलमध्ये कोलकाता नाईट राइडर्स संघासाठी क्रिकेट खेळल्यानंतर २०२१ साली त्याला श्रीलंकेविरोधात टी-२० मालिकेत खेळण्याची संधी मिळाली. त्यानंतर विराट कोहलीच्या नेतृत्वाखाली तो आयसीसी विश्वचषकही खेळला. त्या वेळी त्याने भारतासाठी तीन सामने खेळले, पण त्याला एकाही सामन्यात विकेट मिळविता आली नाही.

वरुणने नुकतीच एका युट्यूब चॅनेलला मुलाखत दिली. यामध्ये त्याने सांगितले की, तो माझ्यासाठी सर्वात वाईट काळ होता. मी नैराश्यात गेलो होतो. मला विश्वचषकात एकही विकेट मिळवता आली नाही याबद्दल वाईट वाटत होते. त्यानंतर तीन वर्ष मला खेळण्याची संधी मिळाली नाही. यासाठीच पदार्पण करण्यापेक्षा संघात पुन्हा संधी मिळणे हे माझ्यासाठी जास्त आव्हानात्मक होते.

### सरावातून यश मिळाले

२०२१ नंतर मी स्वतःला बदलले. त्याआधी मी एका प्रॅक्टिस सेशनमध्ये ५० चेंडू टाकत होतो. त्यानंतर मी दुप्पट चेंडू टाकण्यास सुरुवात केली. निवडकर्ते मला पुन्हा घेतील की नाही याची काळजी न करता मी पुन्हा सरावावर लक्ष केंद्रित केले. हे जरा अवघड होते. तीन वर्षांच्या अथक मेहनतीनंतर मला वाटले सर्व काही संपले, परंतु आम्ही मागच्या वर्षी आयपीएल जिंकलो आणि मला पुन्हा भारतीय संघात खेळण्याची संधी लाभली, असेही वरुण चक्रवर्तीने सांगितले.

# जसप्रीत बुमराहसाठी पत्नी संजनाने लिहिली खास पोस्ट

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संघाचा आघाडीचा वेगवाग गोलंदाज जसप्रीत बुमराह सध्या क्रिकेटपासून काही काळ दूर आहे. बुमराहने ऑस्ट्रेलियातील कसोटी मालिकेत दमदार कामगिरी केली, पण शेवटच्या सामन्यात त्याच्या पायाला दुखापत झाली. त्यानंतर तो अद्यापही तंदुरुस्त होऊ शकलेला नाही. क्रिकेटच्या पिचवर बुमराह शांत असला तरीही प्रेमाच्या पिचवर बुमराहला त्याच्या पत्नीची साथ मिळत आहे.

दुखापतीमुळे बुमराहचा चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेसाठीही भारतीय संघात त्याचा समावेश नव्हता. आता बुमराह आयपीएलसाठी लवकरात लवकर तंदुरूस्त व्हावा याचे प्रयत्न सुरू आहेत, परंतु सध्या मिळालेल्या माहितीनुसार बुमराह आयपीएलच्या पहिल्या काही सामन्यांना मुकणार आहे.

बुमराह आणि संजना गणेसन यांच्या लग्नाला शनिवारी (दि. १५) चार वर्षे पूर्ण झाली. १५ मार्च २०२१ रोजी हे दोघे विवाहबद्ध झाले होते. त्यानिमित्ताने संजनाने एक खास पोस्ट केली आहे. माही चित्रपटातील बॉलीवूड चित्रपटाचे गाण्यातील चार ओळी कॅप्शनमध्ये लिहून तिने रोमँटिक पोस्ट केली आहे. माझं हृदय केवळ तुझ्यासाठीच सुरू आहे, तुझ्यामुळेच मी श्वास घेतेय, तू नसशील तर घरात मन लागत नाही आणि तू जवळ असलास की कसलीच भीती वाटत नाही अशा आशयाचा संदेश लिहून तिने बुमराहला लग्नाच्या वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या तसेच दोघांचा एक रोमँटिक फोटोही पोस्ट केला.

# पाक क्रिकेट बोर्डाकडून खेळाडूंच्या पगारामध्ये कपात

**कराची** : चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेनंतर यजमान पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला मोठा आर्थिक फटका बसला आहे. आता ही भरपाई करण्यासाठी पीसीबीने देशांतर्गत क्रिकेटमधील खेळाडूंचा पगारात कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. प्रसारमाध्यमातील वृत्तानुसार पीसीबीने टी-२० देशांतर्गत क्रिकेटमध्ये खेळणाऱ्या खेळाडूंच्या सामना शुल्कातून जवळपास ७५ टक्के कपात केली आहे. चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत झालेले आर्थिक नुकसान भरून काढण्यासाठी बोर्डाने खेळाडूंच्या खिशाला कात्री लावलीये, अशी चर्चा आहे.



सौजन्य : अमित जाधव - जिल्हाध्यक्ष (उत्तर रायगड जिल्हा अनुसूचित जाती मोर्चा)

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com